काव्य ज्ञानेश्वरी

डॉ. सौ. प्राजक्ता सरपटवार पाठक



काव्य ज्ञानेश्वरी

श्री ज्ञानेश्वरीतील ओव्याचा भावानुवाद

डॉ. सौ. प्राजक्ता सरपटवार पाठक

काव्य ज्ञानेश्वरी

डॉ. सौ. प्राजक्ता सरपटवार पाठक

shabdsanchit-prajaktasarpatwarpathak.blogspot.com

मोबाईल- 9739660082

Email id- dr.prajakta.pathak@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवयित्रीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी कवयित्रीची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान -:

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- २२ जुलै २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. या पुस्तकातील कविता मे-जून २०२३ मधे लिहिलेल्या आहेत. त्यांचा आणि नंतर महाराष्ट्रात घडलेल्या घडामोडींचा काहीही संबंध नाही.

डॉ. सौ. प्राजक्ता प्रशांत पाठक

(प्राजक्ता प्रभाकर सरपटवार)

- शिक्षण- MBBS, DFM, PGDCC
- विविध विषयांवर काव्यलेखनाची आवड
- मित्रमंडळ कट्टा बेंगळूरू तसेच विविध दिवाळी अंकांत कविता प्रकाशित
- "काव्य ज्ञानेश्वरी" हे प्रकाशित होणारे पहिले पुस्तक
- "शब्दसंचित" ह्या ब्लॉग वर विविध कविता, चारोळ्या,हायकू, अलक इ. प्रकाशित (**shabdsanchit-prajaktasarpatwarpathak.blogspot.com**)

आपल्या अभिप्राय तसेच सुचना कळविण्याकरिता संपर्क करा-

मोबाईल- **9739660082**

Email id- dr.prajakta.pathak@gmail.com

प्रस्तावना



श्री. ज्ञानेश्वर माऊली आणि सद्गुरू श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज ह्यांचे चरणी हा ज्ञानेश्वरी काव्य सारांश अर्पण.

ज्यांनी आम्हाला ज्ञानेश्वरी सहज सोप्या भाषेत शिकवली आणि ज्यांच्या प्रेरणेने हा काव्य सारांश लिहीणे शक्य झाले ते गुरूतुल्य असे श्रीमती विजयाकाकू सबनीस, श्री. विवेकदादा सबनीस तसेच श्री.अमितदादा ब्रह्मे यांना सप्रेम सादर.

श्री ज्ञानेश्वर माऊलींना नमन

अलंकापुरी पुण्यभूमी पवित्र,
तिथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र
तया आठविता महापुण्यराशी,
नमस्कार माझा सदगुरु ज्ञानेश्वराशी

नमितो योगी थोर विरागी तत्वज्ञानी संत
तो सत्कविवर परात्पर गुरु ज्ञानदेव भगवंत

मनोगत

मला लेखनाचा वारसा माझे वडिल कै. प्रभाकर सरपटवार ह्यांचे कडून मिळाला. लेखनाची आवड होती पण ज्ञानेश्वरीवर काही लिहू शकेन असे कधी वाटले नव्हते. एव्हढेच काय पण ज्ञानेश्वरी कधी वाचेन असेही कधी वाटले नव्हते. परंतु कोरोनाच्या काळात ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग ऑनलाईन सुरू झाल्याने घर बसल्या श्रीमती विजया सबनीसकाकू, श्री.विवेकदादा सबनीस, तसेच श्री.अमितदादा ब्रह्मे ह्यांचे कडून ज्ञानेश्वरीचे श्रवण घडले. पुढे हळूहळू ज्ञानेश्वरीची गोडी लागली आणि वाढत गेली. अभ्यासवर्गात मानसवारीचा उपक्रम ठरला. मानसवारीत ज्ञानेश्वरी पारायणसह काही साधकांनी भजनसेवा, काहींनी वाचन सेवा तर काहींनी निरूपण सेवा अर्पण केली. त्याचाच एक भाग म्हणून श्री विवेक दादांनी काव्यरूपात **ज्ञानेश्वरीचा सारांश** करण्याची जवाबदारी माझ्यावर सोपावली. हो तर म्हटले पण ही कामगिरी आपल्याला जमेल का आणि तेही वारीच्या अठरा दिवसांत हा मोठा प्रश्न पडला. परंतु हे अशक्यप्राय वाटणारे कार्य माऊलींनी अगदी वेळेत पूर्ण करवून घेतले. माऊलींना त्रिवार वंदन.

सौ. प्राजक्ता सरपटवार पाठक | बंगलोर

dr.prajakta.pathak@gmail.com

९७३९६६००८२

अनुक्रमणिका

अनुक्रमांक	अध्याय
१	अर्जुन विषादयोग
२	सांख्ययोग
३	कर्मयोग
४	ज्ञानसंन्यासयोग
५	योगगर्भयोग
६	आत्मसंयमयोग
७	ज्ञानविज्ञानयोग
८	ब्रह्माक्षरनिर्देशयोग
९	राजविद्याराजगुह्ययोग
१०	विभूतीयोग
११	विश्वरूपदर्शनयोग
१२	भक्तियोग
१३	प्रकृतिपुरुषविवेकयोग
१४	गुणातीतयोग
१५	पुरुषोत्तमयोग
१६	दैवसुरसंपद्विभाग
१७	श्रद्धादिनिरुपणयोग
१८	सर्वगीतासंग्रहयोग

ज्ञानेश्वरी अध्याय पहिला

ज्ञानेश्वरी अध्याय पहिला

अर्जुन विषाद योग

अध्याय हा पहिला, अर्जुनाच्या विषादाचा।
कारण असे हा, गीताशास्त्र कथनाचा।।

कौरव पांडवांच्या युद्धास, सज्ज हे धर्मक्षेत्र पवित्र।
चक्षुने असो वा पुत्रप्रेमाने, अंध असे राजा धृतराष्ट्र।।
म्हणती ते संजयास, सांग मज सारा वृत्तांत।
संजय म्हणे जमले, रथी महारथी युद्धात।।

शंख, ढोल, तुताऱ्या, नगारे वाद्ये वाजे नाना।
भासे जणू प्रलयकाळ, झाली रणगर्जना।।

सारथी ज्याचा श्रीकृष्ण, ध्वजावर असे हनुमान।
दोन्ही सैन्यामध्ये उभा, कासावीस तो बोले अर्जुन ।।

येथे युद्धास उद्युक्त, असे माझेच आप्त।
शिथील झाली गात्र, क्लेश होई अत्यंत।।
कठीण लाकुड कोरितो भुंगा, अडकला परि कमळकळीत।
वज्राहून कठीण अर्जूनाचे मन, अडकला परि आप्त मोहात।।

स्वकीयांना करूनी ठार, कोणाचे कल्याण होणार।
सारेच येथे आपुले, कोणावर करावा शस्त्र प्रहार।।

कुळनाशाचे हे पाप, का न रहावे अलिप्त।
कुळ होता भ्रष्ट, नरकवास होतो प्राप्त।।

राज्यसुखाच्या लोभाने, सज्ज झालो शस्त्रास्त्राने।
कुळनाशाच्या पापापेक्षा, नकोच मला हे जगणे।।

संजय बोले धृतराष्ट्रास, असे म्हणूनी अर्जुन ।
टाकूनी धनुष्य बाण, बैसला शोकाकुल होऊन ||
|| इति प्रथमोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय दुसरा

ज्ञानेश्वरी अध्याय दुसरा

सांख्ययोग

मोहाने ग्रस्त अर्जुन , पडला असे संभ्रमात।
सांख्य योग सांगावया, भगवंत करी सुरुवात।।

म्हणती भगवान, कैसे तुझे हे आचरण।
का करसि विलाप, सज्ज असता रण।।

दुबळेपणा हा मनाचा, नाश करी तव कीर्तिचा।
सोडून कास मायेचा, पाळावा धर्म क्षत्रियाचा।।

तरीही म्हणे कासावीस अर्जुन , चालवू कैसा बाण।
सामोरी असती माझे बंधू, पितामह अन् गुरू द्रोण।।

आप्तांच्या रक्ताने रंजित भोग, वाटे जणु दुर्धर रोग।
बरे जगणे भिक्षा मागून वा करावा देश त्याग।।

चित्त गेले मोहून, विचलित माझे मन।
करा उचित ते कथन, तुम्हा आलो मी शरण।।

बोलती मग भगवंत, बोल तुझे जैसे पंडित।
परि ज्यास सर्व ज्ञात, न करी शोक जीवित वा मृत।।

ना मी ना तू ना बाकी काही, ना होता काळ असा वा होणे नाही।
पाण्यावर दिसती लाटा, लाटा नसता काय पाणी नाही।।

आत्मा देहात फिरे अविरत, ह्या देहातून दुसऱ्यात।
ऋतू येती जाती, तसे सुखदुःख असे अशाश्वत।।

सुखदुःखात जो स्थिर, मोक्षप्राप्तीसाठी योग्य तो वीर।
अविनाशी, शाश्वत असे आत्मा परि नाशवंत असे शरीर।।

आत्मा असे अशाश्वत, ऐसे अज्ञानी मानीत।
परि आत्मा अजन्मा अनादि अव्ययी क्षयरहित।।

आत्मा न मरे शस्त्राने, ना जळे अग्नीने।
ना विरघळला पाण्यात, ना सुकला झंझावाताने।।

आत्मा असे अव्यक्त अचिंत्य, अचल अशोष्य।
सर्वव्यापी सनातन, परि शोक तव नसे योग्य।।

प्रारंभी जीव असे अव्यक्त, व्यक्त होई मध्यावस्थेत।
शोकाची काय गरज, अंती परतला अव्यक्त दशेत।।

कोणा वाटे आत्मा विस्मयकारक, कोणा वाटे अद्भुत।
कोणा आश्चर्य वाटे ऐकून, कोणी ऐकूनही न जाणत।।

त्याचे नित्य होई कल्याण, मनोरथे सारे ही होती पूर्ण।
विचलित न होता जो करि स्वधर्माचे आचरण।।

सुखदुःख, लाभहानी त्यागून करावे स्वधर्म।
पाप न लागे तया, जो करे निष्काम कर्म।।

निश्चयात्मक बुद्धी एक, अनिश्चियी बुद्धीस फाटे अनेक।
स्वर्गासक्तीने करी कर्माधर्माचरण अविवेकी लोक।।

कामवश होऊन कर्मकर्ते मनाने, कर्मे करी व्याप्त फलाशेने।
षड्रस पक्वान्ने नैवद्यासी परि परमात्मा कोण न जाणे।।

न धरावा आग्रह फळांचा, न कर्म न करण्याचा।
असे तव अधिकार निरासक्त कर्म करण्याचा।।

राखावे मनाचे समतोलपणा, सिद्धी असिद्धी समान भाव।
कर्तव्य कर्मात व्हावे स्थिर, त्यास योग ऐसे नाव।।

कर्म जन्य फळांचा त्याग करून, होई बंधनापासून मुक्त।
ऐसे समाधिसुख बुद्धी योग्याला होत असे प्राप्त।।

सोडून मनातील कामना पूर्णपणे, आत्म्याने आत्म्या ठायी संतुष्ट राहणे।
ना दुःखाचा खेद ना सुखाची इच्छा, ऐसी जाणे स्थितप्रज्ञाची लक्षणे।।

घडो शुभ वा अशुभ, ना प्रसन्न होई ना द्वेष करीत।
इंद्रिये सारे आवरून विषयातून होई निवृत्त।।
इंद्रिये ही नेती मनाला विषयाकडे ओढून।
त्याची बुद्धी होते स्थिर, ज्याचे इंद्रिये असे स्वाधीन।।
विषयाचे चिंतनाने विषयासक्ती होई उत्पन्न,कामना, क्रोध, मुढता येई मग तया मागून।
ऐसे स्मृती भ्रष्ट होता त्याचा मग, होत असे शीघ्र अधःपतन।।

जो आत्मसंयमी, इंद्रिये ज्याचे स्वाधीन।
तो नित्य स्थिर, त्याचे अंतःकरण प्रसन्न।।

त्याला न मिळे स्थिरता ज्याला असे आसक्ती।
मग कैसी मिळेल शांति, अन् सुख कुठून येती।।

जेथे निजलेले प्राणी तेथे जागती ज्ञानी।
जेथे निवृत्त ज्ञानी, तेथे मग्न प्राणी।।

जो इच्छेचा त्याग करून, ममत्व अहंकाररहित होऊन।
देहाभिमानाला घालवून वावरे तो जगद्रूप होऊन।।

ऐसी ही ब्रह्मस्थिती अमर्याद, जी अनुभवती पुरूष कामनारहित।
अंतकाळी स्थिर होऊन अनायसे परब्रह्मपदाला होई प्राप्त ||

|| इति द्वितीयोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय तिसरा

ज्ञानेश्वरी अध्याय तिसरा

कर्मयोग

म्हणती पुन्हा अर्जुन , हित माझे निश्चित कशात सांग।
म्हणे भगवान ऐक आता सविस्तर , निष्काम कर्मयोग।।

मोक्षाचं फळ जरी एक, मार्ग परि असती दोन।
कोण करे निष्काम कर्म, कोणी जोडती ज्ञान।।

सिद्ध कसा होणार कर्म न आरंभता वा देता सोडून।
पुरात अडकले असता चालेल का नाव त्यागून।।

कर्म न करता न जाए एक ही क्षण।
त्रिगुणांच्या आधीन आहे प्रत्येक जण।।

कर्मेंद्रिये केवळ आवरून, परि मनी विषयाचे चिंतन।
कर्म त्यागाचा केवळ डौल, तया दांभिक ऐसे जाण।।

परि जो करि इंद्रियांचे नियमन, आसक्तीरहित असे मन।
सर्वश्रेष्ठ तो जाणावा जो करे विहीत कर्माचे आचरण।।

पाण्यात राहूनही न भिजे कमळाचे पान।
गुणात राहूनही न होतो मोहाने मलिन।।

कर्म निष्काम अहंकाररहित, प्रसंगानुसार जे झाले प्राप्त।
ते जो करी आचरण, तो कर्म बंधनातून होई मुक्त।।
ब्रह्मदेव सांगती प्रजाजनांना, यज्ञाने संतुष्ट करा देवांना।
वा करावी गुरूसेवा, अथवा द्यावे भोजन ब्राह्मणांना।।

स्वधर्माचे पालन करता , सुख समृद्धी नांदे सदैव।
क्लेश रहित, निरीच्छ होता, लाभे सर्व वैभव।।

स्वधर्माचरणाचा हा यज्ञ, निष्ठेने घालावी आहूती।
इंद्रियांना करूनी वश, सोडूनी द्यावी विषयासक्ती।।

गुरू, गोत्र, अग्नी गाय यांचे पूजन, ब्राह्मण सेवा, पितरांना नमन।
ऐसे स्वधर्माचरणाचा यज्ञ संपादून यज्ञशेष जो करी सेवन।।

सर्व महापातके त्याला जाती तत्पर सोडून।
जैसे अमृत प्यायलेल्याला महारोग जाती सोडून।।

अन्नाच्या योगाने यज्ञ जाए सिद्धीला।
अन्न हे परब्रह्म, न मानावे साधारण त्याला।।

अन्नाने वाढती प्राणी, पाऊस करे अन्न उत्पन्न।
पाऊसाची उत्पत्ती यज्ञापासून, कर्म करी यज्ञ उत्पन्न।।

कर्म वेदांपासून झाले उत्पन्न, वेद परमात्मा पासून।
त्याचे जगणे व्यर्थ, जो राही स्वधर्म यज्ञ सोडून।।

जो आत्म्याच्या ठायी रममाण, आत्मा योगाने तृप्त।
देहाने कार्य चालता असतांना, कर्माने न होई लिप्त।।

मोक्ष मिळवाया कर्तव्यकर्म करावे अनासक्त होऊनी।
ऐसेचि सिद्धी केली प्राप्त विदेही जनकादिकांनी।।

जे जे श्रेष्ठ पुरुष करती, ते सामान्य जन आचरती।
ऐसे मार्गदर्शन मिळता, जन निष्काम बनती।।

रस्त्यात चालताना आंधळ्याला जैसे सांभाळावे डोळसाने।
अज्ञान्याला दाखवावा स्पष्ट धर्म, ज्ञानीने स्वधर्माचरणाने।।

अर्जूनाला स्पष्ट सांगे भगवान, मला ही करावे लागे धर्माचरण।
जरी का मी निष्काळजी राहीन, लोक करतील माझे अनुकरण।।
पावतील नाश सर्व लोक,मी जर का न केले धर्माचरण।
मी जर राहिलो निष्काम होऊन, लोकांचे कोण करेल तारण।।

अज्ञानी आसक्तीने करती कर्माचरण, ज्ञानीने करावे कर्म ठेवून अवधान।
बुद्धीभेद न करावा अज्ञजनांचा, कर्मे करावीत शांतचित्त ठेवून।।

दुसऱ्याच्या ओझे आपल्या डोक्यावर घेतले, त्या भाराने का आपणच दडपले।
तैसे कर्म सारे होती त्रिगुणांच्या खेळाने, परि कर्तेपण आपल्यावरच लादले।।

कर्म आणि प्रकृतीचे गुण, असती आपल्याहून भिन्न।
हे जेणे जाणिले तटस्थ, झाला देहाभिमान टाकून।।

जे माझे मत अनुसरतील, ते कर्मापासून होतील मुक्त।
परि ते अविवेकी मूढ असती, जे माझे मत सोडून राही देहासक्त।।

प्रत्येक जण वागतो स्वभावाला अनुसरून।
संपत्ती गोळा करी स्वधर्माला विसरून।।

परधर्माचे उत्तम जरी अनुष्ठान, स्वधर्म जरी भासे आचारावया कठीण।
मृत्यु आला करीत असता स्वधर्माचरण, तरी करी तो जीवाचे कल्याण।।

काम क्रोध उत्पन्न करी हा रजोगुण।
इहलोकी हा आपला वैरी तु जाण।।

अग्नी झाकले धुराने, आरश्याला मळाने, चंदनाच्या मुळाला सापाने, गर्भाला वेष्टनाने।
धान्यच बी गुरफटले कोंड्याने, तैसे ज्ञानाला झाकले कामक्रोधाने।।

ज्ञानी लोकांचा नित्य करी द्वेष, कामरूपी अग्नी न होई शांत।
झाकून टाकी तो ज्ञान, पाडी जीवाला काम मोहात।।

इंद्रिये कामक्रोधाचे आश्रयस्थान, करी वासना उत्पन्न।
पापरूपी कामाला आवरावे इंद्रियांना ठेचून।।

देहापेक्षा इंद्रिये श्रेष्ठ, इंद्रियापेक्षा श्रेष्ठ असे मन।
मनापेक्षा बुद्धी श्रेष्ठ, हे सत्य तु जाण।।

करूनी मनाने मनाचे संयमन, कामक्रोधाला हुसकावून।
ब्रह्मज्ञान प्राप्त करून, रहावे आत्मानंदात मिसळून।।
तेच गुरू शिष्याचे रहस्य गुप्त, ज्यास म्हणती जीवाशिवाची भेट।
तेथे तु रहावे स्थिर नित्य, सांगती भगवान अर्जूनास स्पष्ट ||
|| इति तृतीयोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय चौथा

ज्ञानेश्वरी अध्याय चौथा

ज्ञानसंन्यासयोग

आता निष्काम कर्मयोग झाला, ज्ञानसंन्यास योग आला।
जे न सांगितले कोणाला, भगवंत सांगती ते अर्जुनाला।।

म्या सांगितला सूर्यासी, हाचि योग अविनाशी, सूर्याने सांगितला मनुसी, मनुने इश्वाकूसी।
ऐसी परंपरा विस्तारली मुळापासूनी, जाणते झाले तयाचे पुष्कळ राजर्षी।।
बहुत काळ लोटला, ज्ञानाचा विसर पडला।
विषयावर जीव जडला, योग नाहीसा झाला।।

ऐक अर्जूना, संशय सारे टाकून,माझ्या मनातील रहस्य कर्मयोगाचे हे तत्व।
ना सांगितले कोणाला, ना लपविले तुझ्यापासून, तु मम प्रिय, भक्त आणि मैत्रीचे सर्वस्व।।

अर्जुन पुन्हा गोंधळला, कृष्णाला विचारू लागला।
तु आजच्या काळातला, योग सुर्याला कैसा सांगितला।।

असे तुझे हे केवळ अज्ञान, सूर्या असता नसे आपण।
नसे तुला जन्मांचे स्मरण, परि मला प्रत्येक अवताराची आठवण।।

जन्मरहित मी, नाशरहित मी, मायेने सगुण रूपात नटतो मी।
अविनाशी मी, स्वतंत्र मी, कर्माधिन मायेने भासतो मी।।

धर्म क्षीण होऊनी जेव्हा अधर्माचा वाढे भार, साधु संत सज्जनांचा मी घेऊन कैवार।
दुष्ट अधर्मी दुर्जनांचा करावया संहार, सगुण रूपात मी पुन्हा पुन्हा घेतो अवतार।।

माझे दिव्य जन्म आणि कर्म, जाणे जो यथार्थ।
पुन्हा न घेती जन्म, लीन माझ्या स्वरूपात।।
ज्यांचे सर्व गुण गेले, माझ्या आश्रयाला आले।
तप, ज्ञानाने शुद्ध झाले, ते मत्परायण झाले।।

एकच असूनही अनेकत्व पाहे अज्ञानी, असून ही अभेद पाहे भेद कोणी।
परि सारेखच मम आत्मस्वरूप, सर्व काळी, सर्व ठिकाणी।।

जे जैसी भक्ति करती, तैसे फळ मिळविती।
शेतात पेरले जैसे, तेथे तैसेच उगविती।।

मनात धरून हेतु नाना, विविध देवांची करी उपासना।
लाभे त्यांच्याच कर्माचे फळ, जी पूर्ण झाली कामना।।

गुणकर्मांचे जे चार वर्ण, जरी वाटे मी केले उत्पन्न।
परि मज अकर्ता जाण, मग हे सुटे सारे बंधन।।

जे जे झाले मुमुक्षुजन, माझे स्वरूप ओळखून।
तैसे करावे तु कर्म, जैसे त्यांनी केले कर्माचरण।।

कर्म-अकर्माचा ज्ञानीला ही पडे भ्रम, विश्वाला करी जे साकार तया म्हणती कर्म।
वर्ण व आश्रम यांचे विशेष कर्म तेचि विकर्म, जे करावयास नसे योग्य ते निषिद्ध कर्म।।

जो निष्कर्मा,ना फलाशा ज्याच्या मनी,कारण नाही कर्माला कर्तव्यबुद्धी वाचूनी।
ऐसा तो कर्मातीत करी कर्म उत्तम, या लक्षणांवरून जगी ओळखावा ज्ञानी।।

तोचि जाणावा पंडित, जो फलाशा संकल्परहित।
कर्मे तयाचि दग्ध, झाली ज्ञानरूपी अग्नीत।।

मनबुद्धी स्वाधीन, जो इच्छारहित,सहज संतुष्ट, जो मत्सररहित।
कर्मरहित, गुण युक्त असुनही गुणातीत, तो कर्मबंधनाने न होई कधी लिप्त।।
नसे बुद्धीला भेद, कर्म आणि भोक्ता।
कर्म हेच ब्रह्म, समजली तया एकरूपता।।

ध्यान, धारणा, समाधिरूप, संयम हेच अग्नीहोत्र।
मुलबंधादिक तीन बंधरूपी मंत्र, इंद्रियरूपी द्रव्य पवित्र।।

ऐसे अग्नीत वैराग्य रूपी, जळे लाकुड विकाररूपी।
गरजे अहंब्रह्मास्मि मंत्र, अंतःकरणातून धूर निघे आशारूपी।।

कोणी करती दोषांचे क्षालन, कोणी चाले गुरूपदेशाची दोरी धरून।
कोणी समदृष्टीने करी मंथन, ऐसे होई ज्ञानाग्नी उत्पन्न।।

द्रव्य यज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ, वाग्यज्ञ, ज्ञानयज्ञ, सर्वांचेच अनुष्ठान असे महाकठीण।
तेचि करिती जे योग सामर्थ्य संपन्न, करि जीवात्म्याचे परमात्म्यामध्ये हवन।।

कोणी प्राण-आपानाचे हवन, कोणी करि आहार नियमन।
आणिक कित्येक यज्ञे वेद सांगती, होती सर्व कर्मापासून उत्पन्न।।

द्रव्य यज्ञ पेक्षा ज्ञानयज्ञ श्रेष्ठ जाणावा,जीवाभावाने करावी संत सज्जनांची सेवा।
त्या कडूनी घ्यावा उपदेश भला, परमात्मास्वरूप सुखाचा ठेवा।।

ऐसे ज्ञान मिळता, संशय न उरले चित्तात।
सर्व भूते स्वतःसह, दिसे माझ्या स्वरूपात।।

तु जरी अज्ञानी सर्वपापी, तारून नेई नौका ज्ञानरूपी।
लाकडाला जाळी जैसे अग्नी, कार्यांना जळी अग्नी ज्ञानरूपी।।

इंद्रिये जिंकलेल्याला मिळे ज्ञान, ज्ञानी ला मिळे शांती।
ज्ञानहीन, श्रद्धाहीन मनुष्याच्या काही न लागे हाती।।

संशय उत्पन्न झाला अज्ञानापासून, ज्ञानरूपी शस्त्राने नाहिसा करून।
ऐसे ज्ञानीला नसे कर्माचे बंधन, ज्याने मिळविले अद्वैत ज्ञान।।

|| इति चतुर्थोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय पांचवा

ज्ञानेश्वरी अध्याय पांचवा

योगगर्भयोग

निष्काम कर्माचे अनुष्ठान, वा ज्ञानाने कर्माचा त्याग।
अर्जुन म्हणे कृष्णाला, जरा समजावून सांग।।

निष्काम कर्म अन् कर्मत्याग ज्ञानपुर्वक, दोन्ही मार्ग असती मोक्षदायक।
परि तु ऐसे स्पष्ट ओळख, कर्मानुष्ठानाचा मार्ग असे चांगला अधिक।।

जो ना कोणाचा द्वेष करीत, ना कशाची इच्छा करीत।
तो नित्य संन्यासी जाणावा, असे तो मुक्त व्दंद्वरहित।।

जे मिळती सांख्य योगाने, तेच मिळती कर्मयोगाचे।
फळ मिळती दोघांचे, एकाचे जरी अनुष्ठान केल्याने।।

निष्काम कर्मा ठायी जो रत, जितेंद्रिय, शुद्धचित्त।
आत्मस्वरूपाशी एकरूप, सर्वकर्म करूनही अलिप्त।।

जया नाही देहभावाची आठवण, त्या ठायी कैसे काय राही कर्तेपण।
पाहाताना वाटे जरी सामान्य जन, निर्गुण निराकार परब्रह्माचे तया ठायी लक्षण।।

कर्मे सर्व अर्पण करून, फलासक्ती सर्व टाकून।
न होई पापाने लिप्त, जसे पाण्याने न भिजे कमळाचे पान।।

लहान बालकांची हालचाल जशी निर्हेतुक।
तैसे घडे सहज कर्मयोग्याचे कर्म प्रत्येक।।

कर्म योग्याला मिळे शांती, कर्मफल त्यागून।
कर्मयोग हीन कर्माला, बांधला जाई फलासक्त होऊन।।

जितेंद्रिय देहवान पुरूष, सर्व कर्म सोडून मनाने।
न काही करता न करविता, देहनगरीत राही आनंदाने।।

ना मलिन होई त्याची तटस्थवृत्ती, ना भग्न होई सहज स्वरूपस्थिती।
सर्व सृष्टीचा तो कर्ता, परि कर्माने लिप्त न होती।।

आनंद न मानी इष्ट मिळता, खेद न मानी अप्रिय मिळता।
तो ब्रह्माच्या ठिकाणी स्थिर, संशय रहित पुरूष ब्रह्मवेत्ता।

जे उत्पन्न होई विषयेंद्रियाच्या संयोगाने, ते भोग असती दुःखाची कारणे।
परि तोचि खरा सुखी जाणावा, वेग कामक्रोधाचा येई जया थांबणे।।

इंद्रिये मन बुद्धी यांचे नियमन, अंतीम ध्येय ठेवी मुनीजन।
इच्छा, भय क्रोध नाश पावती, नित्य मुक्त तया रे जाण।।

|| इति पंचमोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय सहावा

ज्ञानेश्वरी अध्याय सहावा

आत्मसंयमयोग

भगवंत सांगती अर्जुनास, योग हा खास।
ध्यान, हट, ब्रह्मसाम्य, जसा करावा योगाभ्यास।।

कर्मफलासक्ती नसे ज्याच्या ठायी ह्या जगी।
तैसाच संन्यासी जैसा निष्काम कर्म योगी।।

कर्ममार्गारूपी पायऱ्यांनी चढावे, योगरूपी पर्वत शिखरावर।
प्रथम यमनियमाचा पायथा, योगासनांची पाऊलवाट, चढून जावे मग प्राणायामाच्या कड्यावर।।

आत्म्यानेच करावा उद्धार आत्म्याचा।
आत्मा स्वतःचा बंधु, शत्रुचि स्वतःचा।।

अकस्मात जागे होता, कळे स्वप्नाचा व्यर्थपण।
सोडून देहाभिमान आपणच, करावे आपले कल्याण।।

जो इंद्रिय-जीत, अंतःकरण शांत, जो आत्मबुद्धी।
मानापमान, शितउष्ण, सुखदुःख, परि समबुद्धी।।

ज्याला नसे भेदभाव लहानथोराचा, सोन्याचा पर्वत असो वा ढेकूळ मातीचा।
तो जितेंद्रिय खरा, जरी देहधारी, तो योगी, तो परब्रह्माच्या बरोबरीचा।।

समबुद्धी ठेवी तो जरी असो, स्नेही वा शत्रू, अप्रिय वा इष्ट।
तसेच साधु वा पापी ठायी, तोचि मानावा रे श्रेष्ठ।।

आपल्या मन-देहाचे नियमन करून, निरिच्छ, संग्रहरहित, एकाकी राहून।
आणि एकांतवास स्विकारून, आत्मध्यानात रहावे तल्लीन होऊन।।

अद्वैतरूप दिवस ज्याचा नसे अस्त, नित्य निरंतन स्थिर आत्मस्वरूपात।
एकाकी तो जो तिन्ही लोकात, आत्मस्वरूपाने भरला ओतप्रोत।।

योगाभ्यास करावया, स्थान असावे योग्य।
पाहिले असता त्याला दुप्पट व्हावे वैराग्य।।

योगाभ्यास तेथे आपोआप घडावा।
हृदयाला आत्मानंदाचा अनुभव यावा।।

अशा योग्य आसनावर बसून, चित्त आणि इंद्रिये एकाग्र करून।
अंतःकरण शुद्धीची योग्याभ्यास, करावा मन एकाग्र करून।।

शरीराचा मध्यभाग, मान, शिर, ठेवून सरळ स्थिर।
इकडे तिकडे न पाहता, दृष्टी निश्चल नाकाच्या शेंड्यावर।।

शांत अंत:करण, निर्भय होऊन, करावे ब्रह्मचर्य पालन।
मनाचे संयमन, मत्परायण होऊन, करावे आसन ग्रहण।।
ज्याचे परमेश्वराकडे लागले अंत:करण, ज्याने केले मनाचे संयमन।
मिळवितो मत्स्वरूप शांती, जिचे आहे मोक्षामध्ये पर्यावसान।।

नको अतिविषयोपभोग घेणे, तैसेचि नको त्यांचा द्वेष करणे।
तैसेचि नसे योग्य वाजवीपेक्षा फाजील नियमन करणे।।

अन्न सेवन करावे परि उचित व प्रमाणात, कार्य करावे सारे संतुलित व नियमित।
इंद्रियांना दिले विषयांचे खाद्य नियमित, तर ते करी मनाला संतोषित।।

ऐसे बाह्यक्रिया करता नियमित, आंतरिक सुख जाई वाढत।
न करता ही योगाभ्यास सहज घडत, आत्मसिद्धीचा अनुभव पडे पदरात।।

निवाऱ्याच्या जागी दिवा, जैसे काही हालेना।
तैसाच योगी मुळीच, स्वस्वरूपस्थितीपासून ढळेना।।

पावे चित्त उपरती ध्यानयोगाच्या अनुष्ठानाने।
पावे संतोष आपल्या ठायी आत्मस्वरूप पाहिल्याने।।

सर्व इच्छा समूळ टाकून, मनानेच इंद्रियांना जिंकून।
ना माने लाभ अधिक याहून, ना हाले आत्मस्वरूपापासून।।

आत्मस्वरूपी स्थिर करून मन, अन्य कशाचे न करावे चिंतन।
अभ्यास करता ऐसे जाए रजोगुण, मनाला लाभे उत्तम सुख आणि समाधान।।

ज्याचे मन योगयुक्त, समदृष्टीने पाही सर्वत्र।
प्राणमात्रां ठायी आपण, आपणा ठायी प्राणिमात्र।।

एकरूप विश्व आणि आपण, करी हे सर्व बुद्धीने ग्रहण।
भजी हरिला एकत्व जाणून, अंतःकरणात न होई द्वैत उत्पन्न।।

अद्वैताच्या सुर्योदयाने गेली अज्ञानाची रात्र निवळून,
पंचमहाभूतात्मक शरीरात जरी पडला अडकून।
तो आपोआपच होईल सर्वव्यापी,
माझे व्यापकपण आत्मानुभवाने जाणून।।

म्हणे अर्जुन , जो श्रद्धा युक्त परि ढळला रोगांपासून,
जो भ्रष्ट झाला कर्म आणि योग दोन्ही मार्गापासून।
कैसी मिळेल तया गति का नाश पावत,
करावे कृष्णा तु माझे शंकानिरसन।।

भगवंत पुढे सांगती, योगभ्रष्ट तो, पुण्य कुळी जन्म घेती।
पूर्वजन्माची योग्यबुद्धी, तया पुनः प्राप्त होती।।

योगभ्रष्ट जरी दिसे परतंत्र, योगाभ्यास घेई त्याला खेचून।
जिज्ञासा जाणण्याची योग लक्षण, फळ देईल अधिक वेदाचरणाच्या फळाहून।।

योगाभ्यासाचे आचरण करून, शुद्ध झाला पातकापासून।
ऐसा तो परमश्रेष्ठ योग, पोहचतो मोक्षाला जाऊन।।
|| इति षष्ठोऽध्याय: ||

ज्ञानेश्वरी अध्याय सातवा

ज्ञानेश्वरी अध्याय सातवा

ज्ञानविज्ञान योग

आधी ब्रह्मज्ञानी योग्याचे वर्णन, अर्जुनास सांगती भगवान।
आता ज्ञान विज्ञान व अज्ञान, यांचे देती समग्र ज्ञान।।

पृथ्वी, जल, तेज, वायु, आकाश, मन, बुद्धी आणि अहंकार।
ऐसेची जाणावे माझ्या, प्रकृतीचे आठ प्रकार।।

ऐसे हे प्रकार असता समप्रमाणात, तेव्हा तयाला परा प्रकृती म्हणतात।
परि म्हणती अपरा प्रकृती, असम प्रमाणात असता मिश्रित।।

ऐसे ह्या दोन प्रकृतीपासून, प्राणिमात्र सर्व झाले निर्माण।
परि तयांचा आदि ही मी, मीच अंत, ऐसे तु सत्य नित्य जाण।।

सूक्ष्म ती परप्रकृती, कौतुके धरे स्थूल स्थिती।
अंडज, स्वेदज, जारज, उद्भिज, ऐसे होई प्राणांची उत्पत्ती।।

सोन्याच्या दोऱ्यात सोन्याचे मणी, ऐसी सोन्याची असावी माळ।
माझ्यात गुंफले जग सारे, माझ्याहून नसे काही वेगळं।।

उदकातील रस, चंद्रसूर्यातील तेज, वेदातील ओंकार,
पुरुषातील पौरुष, तपस्व्याचे तेज मीच आहे।

आकाशातील शब्द, भूमितील सुगंध, अग्नीतील तेज,
सर्व प्राण्यांचे जीवन सारे काही मीच आहे।।

सत्व रज तम जे हे प्रकृतीचे त्रिगुण, सर्व ही माझ्या पासून झाले उत्पन्न।
ते आहेत माझ्यामध्ये परि, मी नसे त्यांच्या मध्ये हे जाण।।

ऐसे सर्व जग हे असे, पडलेले त्रिगुणांनी मोहात।
या गुणांनी भिन्न मला, वेगळा नाही जाणत।।
मायेच्या पडद्यामुळे झाकले, माझे आत्मस्वरूप।
मजपासून निर्मिले जीव, तरी न होती मद्रुप।।

दुस्तर ही माया जाण्यास तरून।
तेच तरती जे येती मला शरण।।

दुष्कर्मी, मूर्ख अधम ह्यांचे, मायेने नष्ट झाले ज्ञान।
आसुरी मार्गाने जाई, परि न येती मला शरण।।

मत्भक्ति करणार चार पुण्यवान, एक आर्त, एक जिज्ञासू, एक अर्थार्थी।
एक ज्याला प्राप्त ब्रह्मज्ञान, जो अनन्य नित्य माझ्याशी, श्रेष्ठ सर्वार्थी।।

जसा महात्मा दुर्लभ अत्यंत, ज्ञानी तो भक्त उत्कृष्ट।
स्थिर माझ्या ठिकाणी तो, मलाच तो होई प्राप्त।।

भौतिक कामनांनी केले हरण, असे ज्यांचे सारे विवेकज्ञान।
जाती अन्य देवदेवतांना शरण, पाळी स्वभावानुसार विशिष्ट विधीविधान।।

ज्याची जे जे आराध्य दैवत, त्याची भक्ती करिती ते भक्त।
मग ते जाई त्या देवताप्रत, मज भजती ते येई मजप्रत।।

अविनाशी अत्यंत उत्तम श्रेष्ठ, मत्स्वरुप न जाणती जे भक्त।
अल्पबुद्धी मानीती मज व्यक्त, स्वरूप जरी माझे असे अव्यक्त।।

नसे सर्वांना माझे ज्ञान, मी योगमायेने आच्छादित।
मुढमती मज न जाणती, जन्मरहित मी, मी नाशरहित।।

जाणितो मी गेलेल्या, आलेल्या, आणि येणाऱ्या प्राण्यांना।
परि ते न जाणती मला, जरी मी सर्वत्र ओतप्रोत।।

सुखदुःखादिक द्वंद्वात्मक मोह, इच्छा द्वेष करीत उत्पन्न।
त्याचे सर्व पाप नष्ट होतील, जो करी पुण्याचरण।।

जे अभ्यासती ब्रह्मज्ञान, जाणती अध्यात्म अन् कर्म संपूर्ण।
जे करती माझा आश्रय, त्यांना न बांधती जन्ममरण।।

|| इति सप्तमोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय आठवा

ज्ञानेश्वरी अध्याय आठवा

ब्रह्माक्षरनिर्देशयोग

अर्जुन म्हणती हे पुरुषोत्तम, काय ब्रह्म, काय कर्म, काय अध्यात्म।
आधिभूत काय, काय आधिदैव,आधियज्ञ काय, काय मनोनिग्रह सत्वर सांग मम।।
भगवंत म्हणती, जे अविनाशी परम, तयासि म्हणती रे ब्रह्म।
ब्रह्माची स्वरूपस्थिती म्हणजे अध्यात्म, जीवोत्पत्ती करणारा सृष्टीव्यापार असे कर्म।।

जे का असे नाशिवंत, त्यासी म्हणती आधिभूत।
देहाच्या ठायीचा मी आधियज्ञ आणि जीव हाच आधिदैवत।।

देहांती जे का स्मरण, त्याच वस्तुला जीव होई प्राप्त।
मज स्मरण करता देहांती, जीव मत्स्वरूपास होई प्राप्त।।

सर्वकाळी माझे स्मरण कायम, करावे निष्काम असे कर्म।
स्थिर जो मन बुद्धी मज अर्पून, तो पुरूष तेजस्वी परम।।

सर्वज्ञ, शास्त्र, सुक्ष्मात सूक्ष्म, पुरातन, कर्मफलदायक, करी जगाचं अनुशासन।
प्रकाशयुक्त, नित्य चैतन्यरूप सूर्यासमान, होई प्राप्त त्याला जो देहांती करी स्मरण।।

जे अविनाशी, निरिच्छ विरक्त, ज्यासाठी मुमुक्षू आचरती ब्रह्मचर्याव्रत।
योगाचरणामध्ये होऊन स्थित, देहांती ओंकार उच्चार करीत।।

जो सतत असे अनन्यचित्त, जो नित्य मज स्मरत।
त्या श्रेष्ठ गति होई प्राप्त, ऐसा तो महात्मा स्थिर मजप्रत।।

दुःखाचा जो आगर, पुनर्जन्म जो नश्वर।
न होती कुठल्या लोकी, मज पर्यंत आल्यावर।।

एक एक सहस्त्र युग एक ब्रह्मदेवाचा दिन, अन् एक रात्र।
जे ऐसे जाणती, ते जाणती अहोरात्र।।

ब्रह्मदेवाचा दिवस उजाडता, अव्यक्तापासून व्यक्त होई उत्पन्न।
ब्रह्माची रात्र म्हणजे, व्यक्त होई अव्यक्तात विलीन।।

वेगळी या अव्यक्ताहून, दुसरी परमरूप सनातन।
नष्ट होत नाही ती, जरी नष्ट झाली भूते संपूर्ण।।

अग्नी, ज्योति, दिवस, शुक्लपक्ष व उत्तरायण, ब्रह्मपदी पोहचती या समयी येता मरण।
धूर, बाहेर रात्र, कृष्णपक्ष, व दक्षिणायण, या वेळी होता देहावासन, परतें चंद्रलोकी जाऊन।।

जगाचे मार्ग दोन नित्य, एकाने मिळे पुनर्जन्म।
एकाने होई मुक्त, जो असे निर्मोही योगयुक्त।।

जे पुण्यकारक फल देई, वेदाध्ययन, यज्ञ, तप, दान।
योगी श्रेष्ठ स्थानप्रत येई, इतर फळ मागे टाकून।।

|| इति अष्टमोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय नववा

ज्ञानेश्वरी अध्याय नववा

राजविद्याराजगुह्ययोग

श्रीकृष्ण सांगे समजावून, ऐक रे पांडूपुत्र अर्जुन।
गुह्यतम असा सर्वश्रेष्ठ ज्ञानयोग, असे जो अनन्यसाधारण।।
सर्व विद्यांचा राजा हे ज्ञान, सर्व गुह्यांचा अधिपती हे ज्ञान।
धर्माचे हे सर्वोत्तम निवासस्थान, प्राप्त होता नुरे पुनर्जन्माचे कारण।।

मला न प्राप्त होती ते, जे न ठेवी श्रद्धा या धर्मावर।
फिरत रहाती ते जन्ममृत्य युक्त, संसाराच्या मार्गावर।।

सर्व ब्रह्मांड व्यापले मी, माझे रूप परि अव्यक्त।
स्थित माझ्या ठायी सर्वभूत, मी न त्यांच्या ठायी स्थित।।

आकाशाच्या ठिकाणी नित्य स्थित, सर्वत्र संचार करणारा वायु महान।
माझ्या ठिकाणी तैसे स्थित, असे सर्वभूते हे तु जाण।।

सर्व प्राणिमात्र कल्पांती, माझ्या प्रकृतीत येऊन मिळती।
दुसऱ्या कल्पच्या प्रारंभी, मीच पुन्हा करी त्यांची निर्मिती।।
माझी अविद्यारूप प्रकृति ,माझ्या सत्तेखाली।
प्रकृतिच्या स्वाधीन, परतंत्र भूतं, मी पुन्हा उत्पन्न केली।।

जगाच्या या उत्पत्तीच्य कर्मात, मी उदासीन, निर्विकार, निरासक्त।
कर्माचा विलय होतो माझ्यात, परि मला कर्म बद्ध न करीत।।

मी निमित्त, माझे असे केवळ अनुष्ठान, माया करी चराचर सृष्टी निर्माण।
जीव माझ्या ठायी, परि मी न जीवात, माझा हा ऐश्वर योग तु ज्ञानाने जाण।।

जे का असती मूढमति, माझा श्रेष्ठ भाव न जाणती।
समजून मला कोणी देहधारी, माझी अवहेलना करिती।।

त्यांच्या आशा निष्फळ, ज्ञान असे निरर्थक, त्या अविवेकी लोकांचे असे कर्म व्यर्थ।
वाटे तयांना मोहमयी प्रकृतीचा आधार, ज्ञानार्जन करि परि चित्तात नसे ज्ञान यथार्थ।।

ज्यांच्या ठायी दैवी प्रकृति, आदिकर्ता,अविनाशी मज जाणती।
नित्य माझी उपासना चित्ती, एकनिष्ठ भावाने करि मत्भक्ति।।

तैसेचि दुसरे आणिक कित्येक, विराट स्वरूपी जाणे मम एकत्व।
निरनिराळ्या प्रकाराने करी ज्ञानयज्ञ, ज्ञानरूप अग्नीहोत्राने दूर करि द्वैतभाव।।

शुद्ध ब्रह्मज्ञानाचा उदय मी, मुळ वेद मी, यज्ञ मी, ऋतू मी।
आहुती मी, औषधी मी, स्वधा मी, हवनाग्नि मी, द्रव्य मी, समिधा मी।।

मी जगद्पिता, जगन्माता मी, मी पितामह, पोषण कर्ता मी।
मी जगाची उत्पत्ती, प्रलय, स्थिती मी, मी प्रकृतीचे विश्रांतीस्थान, साक्षी निवासस्थान मी।।

मी करी सर्व उष्ण, मी घेतो शोषून, पुन्हा बरसतो मीच पाऊस बनून।
सत्-असत् सर्व आहे मीच, अमर मी, मीच जे मृत्युच्या आधिन।।

वैदिक कर्म आणि अध्ययन, आणिक जे करी सोमपान।
दिव्य असे दैवी भोग भोगतात, यज्ञाने माझे यजन करून।।

विशाल स्वर्ग भोग भोगून, पुण्यसंचय होता क्षीण।
मृत्युलोकी प्रवेश करती, पुन्हा जन्म घेऊन।।

सायुज्य अथवा मत्सेवा मिळे तया, जे एकनिष्ठेने करी माझे चिंतन।
योग व क्षेम प्राप्त वस्तुचे , मी करितो नित्य रक्षण।।
अन्य देवतांचे भक्त सुद्धा, त्यांची पूजा करतात श्रद्धेने।
माझीच पूजा करतात, ते अज्ञानाच्या मार्गाने।।

यज्ञाचा आरंभ मी, शेवट ही मी, माझ्या शिवाय भोक्ता दुसरा कोण।
जे न जाणी मला यथार्थपणे, त्या दुर्बुद्धी लोकांचे होते अधःपतन।।।

देवभक्तांना देवांची, पितृभक्तांना पितरांची।
भूतांच्या भक्तांना भूतांची, मत्भक्तांना मत्स्वरूपाची।।

जे ज्या मार्गाने करिती भक्ती।
तैसी तया प्राप्त होई रे गति।।

जे काही पाणी फळ फुल पान, भक्त करि मज भक्ति ने अर्पण।
ते सारे मी स्विकारीतो, अल्प ना असे ना तयाचे समर्पण।।
जे काही तुझे कर्म, भोग, हवन, तप आणि दान ते मज कर अर्पण।
होशील तु मुक्त त्यापासून, कर्माची जी शुभाशुभफलरूप बंधन।।

मी समान सर्व भूतांच्या ठिकाणी, मला न परका वा प्रिय कोणी।
जे भजती मला प्रेमाने, ते माझ्या अन् मी त्यांच्या ठिकाणी।।

एखादा दुराचारी महान्, उपासना करी अनन्य भक्त होऊन।
तो साधुच मानावा नित्य, जो आता करि सदाचरण।।

तो शीघ्रचि धर्मात्मा होत, मिळे स्वरूपाची शांती शाश्वत।
तो कधी नाश न पावत, ज्याचे माझ्या ठायी चित्त।।

स्त्रिया, वैश्य, क्षूद्र, जे माझा आश्रय घेती।
नीच कुळात जन्मूनी सुद्धा मिळे श्रेष्ठ गति।।

*

कर अर्पण माझ्या ठिकाणी तुझे मन, माझा भक्त होऊन कर माझे पूजन।
नमन करून मला हो मत्परायण, ऐसे स्थिर होता मिळशील मला येऊन।।

|| इति नवमोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय दहावा

ज्ञानेश्वरी अध्याय दहावा

विभूतीयोग

आधी ऐश्वर्य व भक्ति योग, मग सांगती बाह्य सृष्टीचा त्याग।
भक्ति करावया सुलभ श्री सांगती, आता स्वरूप व्याप्तीचा विभूती योग।।
अर्जुना, तुझ्या हितासाठी आणिक, ऐक माझे श्रेष्ठ हे भाषण।
देव वा महर्षी ना जाणती माझी उत्पत्ती, कारण मीच या सर्वांचे आदिकारण।।

तो मानव ज्ञानी, सर्व पापांपासून मुक्त, जो जाणी मला अनादि, लोकमहेश्वर जन्मरहित।
भिन्नभिन्न जीवांमध्ये माझे विकार, तयासारखे बनून पसरले त्रैलोक्यात।।

ज्यांचा माझ्या ठिकाणी भाव, प्राचीन ऋषी सात कश्यपादि।
माझ्या संकल्पापासून उत्पन्न, माझे भाव चार मनु स्वयंभू आदि।।

सात ऋषी चार मनु ऐसे अकरा भाव झाले उत्पन्न,
सृष्टीच्या व्यवहाराकरिता माझ्या मनापासून।
त्या अकरांपासून अनेक लोकपाल झाले निर्माण,
मग तया पासून सर्व प्रजा झाली उत्पन्न।।

जया माझ्या विभूती ऐश्वर्याचे तात्विक ज्ञान
ते विकल्परहित योगयुक्त ऐसे जाण।
सर्व विश्वाची उत्पत्ती माझ्या पासून,

ज्ञानी प्रेमाने करी भक्ती ऐसे जाणून।।

माझ्या ठिकाणी ज्याचे प्राण व चित्त, एकमेकांस माझ्या स्वरूपाचा बोध करीत।
ज्यांचे कर्म माझ्या विषयी चालतात, ते नित्य संतुष्ट आणि मद्रूप असतात।।

जे प्रेमपूर्वक मज भजती, आणि माझ्या ठायी चित्त ठेवती।
देतो मी त्यांना बुद्धियोग, ज्याने ते मत्स्वरुपला मिळती।।

मी त्यांच्या अंतकरणात राहून, ज्ञ़ानरूपी दिवा जो प्रकाशमान।
त्याने नाश करी मोहरूपी अंधःकार, अज्ञाना पासून झाला जो निर्माण।।

अर्जुन म्हणती भगवंत तु सर्वोत्कृष्ट, तु तेजोमय, परमपवित्र, शाश्वत।
तु दिव्य, आदि, व्यापक जन्मरहित, जे तु सांगितले, ते मी सत्य मानीत।।

ज्या विभुतीने हे संपूर्ण जगत्, तु राहिसी व्यापून।
आपल्या दिव्य विभूती, मला कर तु निवेदन।।

सदैव मला तुझे चिंतन, सांग मज कैसे व्हावे तुझे ज्ञान।
तुझा विभूती योग सविस्तर सांग, ज्याने तृप्त व्हावे होता श्रवण।।

ऐक अर्जूना, सर्व भूतांच्या आदी मध्य अंत आहे मी,
मीच त्यांच्या अंतःकरणातील असे आत्मा।
विष्णु नामक आदित्य मी, अंशुमन सूर्य मी,

मरूद् गणात मरीचि मी, मीच नक्षत्रातील चंद्रमा।।

वेदांमध्ये सामवेद मी, देवांमध्ये इंद्र मी,
इंद्रियांना मध्ये मन मी, सर्व भूतांची चेतना मी।
रुद्रांमध्ये शंकर मी, यक्षांमध्ये कुबेर मी,
वसुंमध्ये अग्नी मी, पर्वतांमध्ये मेरूपर्वत मी।।

पुरोहितांमध्ये बृहस्पती, सेनानायकांमध्ये कार्तिकेय,
महर्षीमध्ये भृगू, वाणीमध्ये एकाक्षर ॐ मी।
यज्ञामध्ये जपयज्ञ मी, स्थावर पदार्थ मध्ये हिमालय मी,
वृक्षांमध्ये पिंपळ, देवर्षी मध्ये नारद, गंधर्व मध्ये चित्ररथ मी।।

अश्वांमध्ये उच्चैःश्रवा मी, गजेंद्रामध्ये ऐरावत मी,
नरांमध्ये मध्ये राजा मी, आयुधांमध्ये व्रज मी।
गायींमध्ये कामधेनु मी, प्रजोत्पत्तीला कारणीभूत मदन मी,
सर्पांमध्ये वासुकी मी, नागांमध्ये अनंत मी।।

जलदेवांमध्ये वरुण, पितरामध्ये अर्यमा, संयमकर्त्यांमध्ये यम मी,
दैत्यांमध्ये प्रल्हाद,कर्मांची गणना करणाऱ्यांना मध्ये काल मी।
पक्ष्यांमध्ये गरूड, मृगांमध्ये मृगेंद्र म्हणजे सिंह मी,
वेगवान वस्तुंमध्ये वायु, शस्त्रधाऱ्यांमध्ये राम मी।।

जलचरांमध्ये मकर मी, नद्यांमध्ये जान्हवी मी,

विद्यांमध्ये अध्यात्म विद्या मी, भाषणातील वाद मी।
अक्षरांमध्ये आकार मी, समासामध्ये व्दंद्व समास मी,
अक्षराला व जगाला उत्पन्न करणारा विश्वमुखी पुरूष मी।।

सर्वांचा संहारक मृत्यु मी, कल्पांतानंतर पूनर्निर्माता मी,
किर्ती, संपत्ती, वाणी, स्मृती मी, बुद्धी, धृती आणि क्षमा मी।
सामांमध्ये बृहत् साम मी, छंदांमध्ये गायत्री छंद मी,
मासामध्ये मार्गशीर्ष मी, ऋतुंमध्ये वसंत ऋतु मी।।
छळ करणाऱ्या वस्तूंत द्युत मी, तेजस्वीत तेज मी,
सिद्धी मी, उद्योग मी, सात्विक वस्तुमध्ये सत्त्व मी।
यादवांमध्ये श्रीकृष्ण मी, पांडवांमध्ये अर्जुन मी,
मुनींमध्ये व्यास मी, कवींमध्ये शुक्राचार्य मी।।

दंड करणाऱ्यांचा अनिवार्य शासन मी, धर्मशास्त्रामध्ये नीतिशास्त्र मी।
सर्व गुह्य वस्तुं मध्ये मौन मी, ज्ञानी माणसांचे ज्ञान मी।।

वैभवाने, संपत्तीने, उदारतेने जे युक्त, ते माझ्या तेजापासून उत्पन्न।
आपल्या एकाच अंशाने मी, राहिलो सर्व विश्व व्यापून।।

|| इति दशमोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय अकरावा

ज्ञानेश्वरी अध्याय अकरावा

विश्वरूपदर्शनयोग

आपल्या सर्व विभूती भगवान सविस्तर सांगती।
अर्जुन झाला आतुर पहावया विश्वरूपाची व्याप्ती।।

अर्जुन म्हणती, माझ्यावर कृपा करून, जे सांगितले तुम्ही अध्यात्म ज्ञान।
माझा मोह नाहिसा झाला निःशेष, ऐकताच तुमचे हे गुह्य भाषण।।

जे तू केले तुझ्या स्वरूपाचे वर्णन, करिता मी ते श्रवण,
चित्त माझे झाले फार उत्कंठीत, वाटे व्हावे तुझे स्वरूप दर्शन।
जर असे तुझे रूप पहाणे शक्य, वाटे मी जर तुला योग्य,
सत्वर दाखवी मज विशाल विश्वरूप हे श्रीमन्।।

श्रीहरी म्हणती काय दाखवू तुला, पाहा नाना वर्णाची अनेक रूपे, नाना दिव्ये।
आदित्य, वसू, रूद्र, अश्विनीकुमार पाहा, मरुद् गण, व न पहिलेली आश्चर्ये।।

याच माझ्या देहाच्या ठिकाणी पहा सर्व चराचर,
विश्वमूर्तीच्या प्रत्येक रोमरंध्रात सृष्टीचे अंकुर।

ब्रह्मांडे सारी होती खालीवर विश्वरूपाच्या सांध्यात,
एक भागावर पहा तु विश्वाचा संपूर्ण विस्तार।।

पाहता अर्जूनाला स्तब्ध, उत्कंठीत परि निःशब्द,
म्हणे हरि विश्वरूप मी दाखविले, परि तुला न दिसे।
चतुर पार्थ म्हणती इंद्रियांपलिकडचे तुझे विश्वरूप,
नसता ज्ञान दृष्टी, चर्मचक्षुने मी पाहू तरी कसे।।

संपूर्ण विश्वरूप पहावयास ज्ञानदृष्टी देतो तुला,
भगवंत ऐसे म्हणताच अर्जूनाचा अंधःकार दूर झाला।
उजळल्या जणू ज्ञानज्योती प्रकाशित करी ब्रह्मसाम्राज्याला,
ऐसे ऐश्वर्य योग आपला, श्रीकृष्ण दाखवी अर्जुनाला।।

आश्चर्य चकित झाला अर्जुन , म्हणे आता होते, गेले कुठे गगन।
कुठे स्थावर वस्तु, कुठे पंचमहाभूते, कुठे दिशा जाणे कोण।।

चंद्र नक्षत्रांचा समुह गेला लोपून, सृष्टीची रचना टाकली गिळून।
गेली बुद्धीची निर्णय शक्ती आणि हरपले मनाचे मनपण।।

झाली मनाच्या एकग्रतेची परिसीमा, प्राप्त झाली स्तब्धता स्तब्धपणाला।
आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाल्यामुळे, विश्वरूप पाहता अर्जुन समाधान पावला।।

ज्यात अनेक मुखे, अनेक डोळे, आश्चर्यकारक देखावे,
दिव्य आयुधांनी उगारलेले हात, युक्त दिव्य अलंकाराने।
वा काळरात्रीची उसळलेली सैन्यदळे, भयाचे किल्ले,
अद्भुत भयंकर, निरूपम, मनोहर मुखे पाहिली अर्जूनाने।।

दिव्य सुमन व दिव्य वस्त्र केले धारण, अनंत, सर्वतोमुख, सर्व आश्चर्य नी पूर्ण।
सहस्त्रावधी सूर्याची प्रभा प्रकटावी आकाशात, ती कदाचित होईल श्रीहरिच्या प्रभेसमान।।

देवाधिदेवांच्या विश्वात्मक शरीरात एक स्थित, अनेक रूपाने विभक्त असलेल्या संपूर्ण जगत्।
पाहता अर्जुन विस्मयाने झाला रोमांचित, अंतःकरणात ब्रह्मानंद झाला जागृत।।

म्हणे अर्जुन , देवा तुझे विश्वरूप अद्भुत, पहातो आहे मी तुझ्या दिव्य शरीरात।
सर्व देव, ऋषी, ब्रह्मदेव, वासुकी शेष न् सर्वभूत, परि न कळे मज तुझा आदी, मध्य, अंत।।

मुकुट, गदा, सुदर्शन चक्र केले धारण, त्याचे तेज आणि मोठेपण विलक्षण।
अग्नी अन् सूर्याच्या प्रभेसमान दैदिप्यमान, मी सर्वत्र तुलाच पाहतो आहे भगवान।।

अक्षर परमवेद्यतत्व तुच भगवान, तुच साऱ्या जगाचे आश्रयस्थान।
वैदिक धर्मरक्षक तु पुरूष सनातन, विश्वाचे अविनाशी तत्व तु अव्यय गहन।।

तु आदि, मध्य, अंत रहित, तुझ्या पराक्रमाला नसे अंत।
चंद्र सूर्य डोळे तुझे, मुख अग्नी दीप्तीमान, तेज तुझे विश्वाला जणू टाके जाळून।।
सर्व दिशा भुमि अन् आकाश, यामधील सर्व प्रदेश, अंतरिक्ष।
व्यापलेल्या आहेस तु एकट्याने, अतिभयंकररूप पाहून त्रैलोक्य व्याकुळ भयाने।।

कर्माचे बीज जाळून ज्ञानी लय पावत तुझ्या स्वरूपात,
दुसरे कोणी प्रार्थना करित आहे होऊन भयभीत।

रुद्र, आदित्य, वसु, साध्य, अश्विनीकुमार, तरुण, पितर,
गंधर्व, यक्ष, असुर, सिद्ध पाही तुला होऊन विस्मित।।

तुझे अनेक मुखे, नेत्र, बाहू, पाय, उदर, अनेक दातांमुळे दिसे अक्राळविक्राळ।
तेज:पुंज, अनेक वर्णांनी युक्त, विविधरूप युक्त, तुला पाहून झालो मी भयाने व्याकुळ।।

पाहता हे तुझे रूप अतिभयंकर, तुझ्या विश्वरूपाचा होता साक्षात्कार।
माझे सर्व ज्ञान गेले देशोधडीला, माझ्यावर तु सत्वर कृपा कर।।

कौरव, पांडव, द्रोण, कर्ण, आणि पितामह भीष्म, सर्व तुझ्यात प्रवेश करिती एकदम।
कित्येक शिरती भयानक मुखात, कित्येक अडकले अक्राळ विक्राळ दातात।।
अनेक नद्या समुद्राकडे धाव घेतात, पतंग अग्नी मध्ये शिरत असतात।
आयुष्याच्या प्रवास करून, जीव प्रवेश करतात तुझ्या मुखात।।

ज्याने उग्ररुप केले धारण, असा तू आहेस तरी कोण।
कर तू माझ्यावर अनुग्रह, करतो तुला मी नमन।।

जगाचा नाश करणारा काळ मी, देव म्हणती प्राण्यांचा संहारक मी।
तू आता हो केवळ निमित्तमात्र, सर्व योध्दांचा काळ ठरवतो मी।।

भीष्म, द्रोण, जयद्रथ, कर्म, ह्यांचा तु वध कर,
मी आधीच केला वध त्यांचा, न भीता तु युद्ध कर।
ऐसे देवांचे भाषण ऐकून, त्यांना नमन करून,
बोलू लागला अर्जुन , परि कंठ येई दाटून।।

आनंदित होई संसार तुझ्या कीर्तीने विशेष, आत्यंतिक प्रेम करती तुझ्यावर निःशेष।
तुला नमन करती सर्व सिद्ध समुदाय, भयभीत होऊन नावे राक्षस दिशांकडे दश।।

सत्-असत् ह्यांच्या पलिकडे जे अविनाशी ब्रह्म।
तु श्रेष्ठ, नमन का न करणार तुला देव ब्रह्म।।
तु विश्वाचे अखेरीचे निवासस्थान।
सर्वज्ञ श्रेष्ठ असे तु आश्रयस्थान।।

तु वायु, तु यम, तु अग्नी, तु वरूण, ब्रह्मदेवाचा ही पिता तु,
सहस्र वेळा नमन करतो तुला।
सर्व वस्तुत तु, सर्व स्थानी तु, निर्गुण निराकार, सगुण साकार तु,
जेथे असशील तेथे नमन करतो तुला।।

तुला मी न जाणून, तुला सखा समजून, प्रेमाने वा अमर्यादेने केलं जे भाषण।
एकांती वा सभेत, तुझा केला उपहास, क्षमा कर मला, केला तुझा अपमान।।

जगतपिता तू, जगद्गुरु तू, श्रेष्ठ पूज्य तू।
त्रैलोक्यात एकमेव, अद्वितीय अनन्य तू।।
योग्य समर्थ तुला करावया प्रसन्न।
साष्टांग नमन करून करतो तुझे स्तवन।।

विश्वरूपदर्शनाचा जो मी हट्ट धरला।
तो हट्ट लडिवाळ तू प्रेमाने पुरविला।।

परि भयाने व्याकुळ झाले माझे मन।
ओढ ज्याची मनाला रूप ते कर धारण।।
श्री भगवान म्हणती होऊन संतुष्ट।
हे रूप माझे सर्वव्यापी, सर्वांचे मूळ, उत्कृष्ट।।

दाखविले तुला योगसामर्थ्याने प्रसन्न होऊन।
न पाहिले कोणी मृत्युलोकी तुझ्यावाचून।।

शक्य नसे कोणालाही माझे विश्वरूप दिसणे, वेदाध्यायनाने, यज्ञ दानाने, कर्म वा तपाचरणाने।
घोर माझे रूप पाहून नको होऊ भ्रमित भयाने, पूर्वीचे माझे सगुण रूप पहा आनंदाने।।

तुझे सौम्य मानवरूप पाहून, पुनः प्रसन्न झाले माझे मन।
बुडत होतो विश्वरूपी सागरात, आलो किनारी होता सगुणरूप दर्शन।।

माझे रूप जाणायला अर्जूना, मत्स्वरूपात व्हाव्या लीन,
माझ्या ठायी अनन्य भक्ति हेचि एक साधन।
माझ्यासाठी ज्याचे सर्व कर्म, जो उपाधिरहित,
जो न कोणाचा वैरी असा भक्त होतो मला प्राप्त।।

|| इति एकादशोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय बारावा

ज्ञानेश्वरी अध्याय बारावा

भक्तीयोग

पाहुनी भगवंताचे दोन्ही रूप, अर्जुन म्हणती सांग कृष्णा।
श्रेष्ठ कोण जे व्यक्त स्वरुपाची करे भक्ती, की जे करी अव्यक्त अक्षरब्रह्माची उपासना।।

माझ्या ठायी ज्याचे सर्वेंद्रिय मनोभाव, प्रेमाने सर्वस्व करे मला अर्पण।
जे करती माझी उपासना रात्र न दिन, तेच परम श्रेष्ठ योगी अर्जुना तू जाण।।

ज्यांच्या ठायी सोऽहम् भाव, भजती जे अविनाशी निर्गुण रूप।
इंद्रियनियमन, समबुद्धी, सर्वांचे हित करणारे, ते देखील प्राप्त करती मत्स्वरूप।।

अव्यक्त ब्रह्माची प्राप्तीचा मार्ग, देहधाऱ्यांना असे अत्यंत कठीण।
आडवी असे मार्गात कामक्रोधादि विकार, इंद्रपदादि, ऋद्धि सिद्धिची विघ्न।।

जे करती माझी उपासना सगुण, जे सर्व कर्मे करून मला अर्पण।
अनन्यभक्तिने चित्त ठेवी माझ्या ठायी, होती ते भक्त माझे प्रियजन।।

ऐसे तू मीचा द्वैत काय उरेल, मन बुद्धी माझ्या ठायी होता स्थिर।
नसेल स्थिर जरी चंचल चित्त तुझे, कर अर्पण मला मन बुद्धी चित्त क्षणभर।।

हे ही जरी वाटे तुज कठीण, कर ज्ञान ध्यान भजन पूजन।
अर्पून मला उणे-पूरे सारे कर्तेपण, चित्ताने अखंड कर माझे स्मरण।।

हे ही जमत नसे जर साधन, कर्मारंभी वा अंती ठेव माझे स्मरण।
वा कर बुद्धी, मन, इंद्रिय नियमन, सत्कर्म भावना ही शुन्यात जाऊ दे विरून।।

हठयोग, ज्ञानयोग, ध्यानयोग, अभ्यास योग, या सर्वांपेक्षा सोपा हा कर्मफलत्यागयोग।
कर्मे दुरावली तरच होईल कर्मत्याग, अखंड शांति प्राप्तीचा हा एकमेव मार्ग।।

अभ्यासहून असे ज्ञान गहन, ज्ञानापेक्षा श्रेष्ठ असे ध्यान।
ध्यानापेक्षा कर्मफल त्याग श्रेष्ठ, शांति सर्वश्रेष्ठ कर्मफलत्यागाहून।।

कोणाबद्दल ही ना द्वेष करी, मैत्री वागणारा जो कृपायुक्त।
सुखदुःख समान मानी, अहंभाव रहित, तो भक्त क्षमाशील, नित्य शांत।।

माझ्या ठिकाणी ज्याचे मन दृढ, सर्वदा, संतुष्ट, नियतचित्त।
ज्याने मन बुद्धी केली मला अर्पण, असा जो तो माझा प्रिय भक्त।।

जो इतरांना बद्दल खेद वा तिरस्कार करीत नाही, ज्यांच्या ठिकाणी प्रिय-अप्रिय भेद नाही।
भय, क्षोभ, द्वंद्व रहित जो मज अनन्य राही, असा तो भक्त मला अत्यंत मोही।।

कर्मफलाबद्दल उदासीन, संसारदुःख विरहित, कर्मारंभास अवश्य करणारा, अहंकाररहित।
कर्म करण्यात दक्ष, निरपेक्ष, शुचिर्भूत, मला अत्यंत प्रिय असे तो भक्त।।

जो कशातही आनंद वा खेद नाही मानीत, अप्राप्त वस्तू बद्दल शोक वा खंत करीत।
ब्रह्माच्या स्वानुभव आल्यामुळे जो, कशाचीही इच्छा नाही करीत।।

ज्याच्या ठायी समत्वभाव असणारा, शीत-उष्ण, सुखदुःख समान मानणारा।
मौनी, निंदा स्तुती समान मानणारा, जे मिळेल त्यात संतोष मानणारा।।

स्थिर बुद्धी भक्तिमान योगी, श्रद्धा युक्त आणि मत्परायण।
तो भक्त मला अत्यंत प्रिय, मी सांगितल्याप्रमाणे करी आचरण।

|| इति व्दादशोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय तेरावा

ज्ञानेश्वरी अध्याय तेरावा

प्रकृतिपुरुषविवेकयोग

पुढे सांगती श्री भगवान, ऐक रे उत्तम असे ज्ञान।
देह हे असे क्षेत्र, रे अर्जुन , क्षेत्रज्ञ तो ज्याला ह्याची जाण।।

सर्व क्षेत्राच जो करतो पालन, तो क्षेत्रज्ञ मीच आहे तु जाण।
ह्या क्षेत्र-क्षेत्रज्ञ जाणणे, हेचि समज यथार्थ ज्ञान।।

ऋषीमुनींनी गहन चर्चा करून, हे क्षेत्र-क्षेत्रज्ञाचे उत्तम ज्ञान।
वेगवेगळ्या छंदोबद्ध ग्रंथांनी, अनेक प्रकारे केले वर्णन।।

जीववादी म्हणे देहाचा मालक जीवच मुळ।
आणिक प्राण असे त्यातील कूळ।।

मेहनती चार भाऊ अपान,व्यान, उदान्,समान।
तयाचा कारभार पाहणारा कुळवाडी असे मन।।

पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये अशा बैल जोड्याने, करे विषयरूपी शेतात मेहनत चांगली सतत।
जन्मोजन्मी जीव दुःख भोगी, अनिती वा अकर्माने चुकवूनी कर्मे विहीत।।

परि प्रकृतीवादी म्हणती, क्षेत्र हे केवळ जीवाचे नसती।

जीवाची तात्पुरती या क्षेत्रात वस्ती, सांख्य म्हणे जिला अनादि प्रकृती।।

प्रकृतीचे गुण सत्व रज तम हे तीन, रज करे पेरणी, सत्व करे रक्षण।
पीक कापून गोळा करतो तमोगुण, पिकांची मळणी होई काळरूपी बैलांकडून।।

ह्यावर बोले एक पक्ष संकल्पवादी।
शून्य ब्रह्माच्या शय्येवर झोपला संकल्प आदि।।

झाला तो संकल्प अकस्मात जागा।
निर्माण झाल्या सृष्टींच्या बागा।।

पंचमहाभूतांच्या मर्जी प्रमाणे, देह पंचात्मक झाली निर्माण।
जारज, अंडज, स्वेदज, उद्भिज, झाल्या पृथ्वीच्या चार योनी उत्पन्न।।

भव रानात करावया येरझाऱ्या।
फिरण्या जन्ममृत्युच्या फेऱ्या।।
आदिसंकल्पाने बनवली सुंदर वाट।
चालवली घराण्याची वहिवाट।।

यावर म्हणती स्वभाववादी, नसे कोणा एकाच्या मालकीचे।
हे देह क्षेत्र स्वभाव सिद्ध, नीटनेटक जपले त्यांच्या उपयोगाचे।।

काळाची सत्ता असे देह क्षेत्रावर, काळाची ही सत्ता असे अनिवार।

सत्यलोकी वा स्वर्गात प्रवेश करी, दिग्गजांचा ही काळसत्ता करे संहार।।

ऋग्वेदातील जे बृहत् साम नामक सुत्र, जे ज्ञानदृष्टीने असे अत्यंत पवित्र।
पुष्कळ ज्ञानाचा साठा भरलेले त्यात, परि त्यालाही न कळले हे क्षेत्र।।

क्षेत्राची तत्त्वे एकुण छत्तीस, पांचमहाभूते, अहंकार, बुद्धी, प्रकृती।
दशेंद्रिये,दहा विषय, एक मन, अव्यक्त, सुखदुःख, चेतना, धैर्य, इच्छा संघात, धृती।।

पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, ही पंचमहाभूते ठेव ध्यानात।
अहंकार गुप्त प्रकृत्तिच्या पोटात, जो पंचमहाभूताचा देह नाचवित।।

जी करे पापपुण्य निवाडा, बुद्धीचे लक्षण असे काय।
चांगले वाईटाचा करे निवाडा, इंद्रियांनी जिंके विषयांचा समुदाय।।

परा प्रकृती म्हणजेच जीवदशा प्रकृती, हिलाच सारे अव्यक्त प्रकृती म्हणती।
आपला स्थूल धर्म टाकूनी पंचमहाभूते, हिच्या ठायी सुक्ष्म होऊन लीन होती।।

कान, नाक, डोळे, त्वचा,जिव्हा, ह्यास म्हणती पांच ज्ञानेंद्रिये।
वाणी, हात, पाय, गुद, उपस्थ, ही पांच असती कर्मेंद्रिये।।

ब्रह्माला जीवदशा मिळे मनाच्या संगतीने, मन म्हणजे मुर्तिमंत कल्पना।
उत्पन्न करी द्वैत भावना, विषयभोगात लोटून देई इंद्रियांना।।

शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध, हे विषय पंचज्ञानेंद्रियांचे।
उच्चार, देवघेव, चाल, विसर्जन, हे विषय पंचकर्मेंद्रियांचे।।

आठवणींचे जागृत जी वृत्ती, इंद्रिये विषय न् कामामुळे जी वाढती।
बुद्धीला वेड लावी जी वृत्ती, तिलाच इच्छा म्हणती।।

जो का विषय इच्छित, परि तो न झाला प्राप्त।
घडून येतात ऐसी स्थिती, वृत्ती जी झाली तिला द्वेष म्हणती।।

काय सांगावे सुख म्हणजे काय।
जे मिळता विसरती इतर विषय।।

जीवशिव ऐक्य होता प्राप्त।
त्यास सुख असे म्हणतात।।

ऐसी स्थिती न मिळे जेव्हा अर्जुन , तेचि दुःख ऐसे तु जाण।
स्थिरता अन् चंचलता मनाची, हेच सुखदुःखाचे असे कारण।।

देहात असंग सर्वसाक्षीभूत, उदासीन चैतन्याची शक्ती,
शरीरात अखंड असे जागृत, तया चेतना ऐसे म्हणती।

पंचमहाभूत सहसा न होती एकजुट, एकत्र येऊन होई देहाच्या रूपाने प्रकट,
जिच्या योगाने घडून कायम राहती, तया धैर्य वा धृती म्हणती।।

जीवासह या छत्तीस तत्त्वांचा गट, तयाला म्हणत असे संघात।
ऐसे या तत्त्वांचा समुदाय, त्यालाच क्षेत्र ऐसे म्हणतात।।

जे जे उत्पन्न होई अन् पावे नाश, ते सर्व काही असे क्षेत्र।
त्रिगुण न् कर्मायोगाने घडल्या योनी, त्यास ही म्हणतात क्षेत्र।।

ज्या ज्ञानाने येई जीवब्रह्म ऐक्यभाव, ज्यांच्या प्राप्ती मुळे द्वैताचा होई अभाव।
आत्मानंदाच्या राशीवर लोळे जीव, ज्ञानीची लक्षणे अर्जूना तू ध्यानात ठेव।।

जया ठायी अहिंसा, शांती, सरळपणा।
मनात नसे इच्छा वा नसे दांभिकपणा।।

असे त्या ठायी गुरूसेवा अन शुद्धता।
आणिक आत्मसंयमी व मनाची स्थिरता।।

ज्याला न आवडी स्तुती सुमन, आदरसत्कार वाटे मरणासमान।
लौकिक नावाडी ज्याला, ज्ञानीचे हे अमानित्त्व लक्षण।।

जो परोपकार उच्चारित नाही, न करी लोकांचे मनोरंजन।
न धर्माचरणाचे ढोंग न देहाचे सोंग, ऐसे जाण अदांभिकाचे लक्षण।।

स्वतःच्या प्राणापेक्षा जपे इतरांचे प्राण, चाले जपून कृमीकिटकांकडे लक्ष ठेवून।

वाणीत दया अन् कृपामय आचरण, ऐसे जाणावे अहिंसेचे लक्षण।।

कृपा तत्पर सत्पुरुषाचे हात, मनोरथ त्यांचे असे कृतार्थ।
जे निष्क्रिय व्यापाररहित, अकर्ता पुरूषा ठायी स्वस्थ।।

मनाच्या आधारे चाले इंद्रियांचा व्यापार, अनुभवास येई इंद्रियांच्या कर्माने बाहेर।
इंद्रियांची ही अहिंसा क्रिया अर्जूना, असे तो मनाचाच व्यवहार।।

जेवढा संतोष होई, इच्छित होता प्राप्त, तेवढाच आदर करे दुःख येता अनेपक्षित।
तोचि ज्ञानी जो मानापमान, सुखदुःख, निंदा स्तुती सर्व समान तो मानीत।।

आपलेचि स्वरूप सर्व भोग, जे देहाला होती प्राप्त।
ज्ञानालाही तो भूषणास्पद, जया ठायी क्षमा आक्रोश रहित।।

ज्याचे सर्वांवर प्रेम समान, नसे मनात आप-परभाव।
सर्वांशी करे वर्तन समान, असा सरळपणा म्हणजे आर्जव।।

संशयाचा गुप्त जागा नसे मनात, तो तृप्त आहे आत्मानुभवात।
नसे क्षुद्र बुद्धी, वा कपट दृष्टीत, दशेंद्रिये शुद्ध सरळ निष्कपट।।

गुरूसेवा जणु भाग्याची जननी, जो जाणती, तया ठायी गुरूभक्ति।
सर्वस्व आपले गुरूकुळाला अर्पूनी, मनी गुरूंचे ध्यानाने उपासना करती।।

गुरु विषयी प्रेम भरले मनात, त्यांना क्षीरसागर नाव देती।
गुरुमूर्तिचे प्रेमाने ध्यान करत, मानसिक सुखाचा अनुभव घेती।।

आता ऐक बाह्य सेवेचा प्रकार, गुरुसेवे साठी ज्ञानी नित्य तयार।
नसे सेवेचा हिशोब रात्रदिन थोडाफार, त्याचे सर्वस्व असे गुरूंचे दार।।

अंतर्बाह्य स्वच्छ जसा कापूर। तैसे शुद्ध त्याचे मन आणि शरीर।।
शरीर शुद्ध होई गुरुसेवेने। आणि मन अंतरीच्या ज्ञानाने।।

अंगी त्याच्या केवळ शुचित्व। अंतर्बाह्य सारखीच निर्मलता।।
विकारांचा लेप न लागे जराही। विषयभोगात ही असे अलिप्तता।।

स्थिरता नित्य ज्याच्या मनात, तो ठेवी ज्ञानाला जिवंत।
विकल्पाने मन न होई दुषित, ह्यालाच शुचित्व म्हणतात।।

कुठल्याही विकाराने मन नाही ढळत। अटके षड्रिपूंच्या विळख्यात।।
त्याचा जणु स्वभावच दृढ स्थैर्य। कल्पनांती ही न सुटे त्यांचे धैर्य।।

मनोवृत्तीला इंद्रिययांकडे नाही जाऊ देत, ठेवी सर्वेंद्रियांना समजूतीने निग्रहात।
यम-दम जागृत निवृत्तीच्या पहाऱ्यात, रममाण चित्त आणि चैतन्याच्या एकरूपतेत।।

ऐसे होता होई ज्ञानाचा विजय, ह्यालाच अंतःकरण निग्रह म्हणतात।
पाळे त्याची आज्ञा अंतःकरण विनम्रतेने, तोचि जाणावा ज्ञानाचे स्वरूप मूर्तिमंत।।

मनोनिग्रह, इंद्रिय निग्रह असे प्रिय, परि तया न आवडी विषय।
एकांतवास, तप-व्रताचरण करे नित्य, आत्मलाभाचे वैभव हे विषयवैराग्य।।

आस्थेने करी कर्मे ज्यात जनहित, तैसेचि आचरती यथासांग कर्मे विहीत।
परि कधी ना त्याचा अभिमान बाळगत, त्याचा सर्व आचार घडे अहंकार रहित।।

येणाऱ्या घटनांना पाही साक्षीभावाने, खंत वाटे पुन्हा जन्म घेणे।
मन वेडे होईल म्हातारपणाने, आधीच भरी मन आत्मज्ञानाने।।

ज्याच्या वियोगाने होई विघ्ने उत्पन्न, त्यावरील प्रेम देई सोडून।
दोष प्रवेश करती ज्या इंद्रियांच्या द्वारा ने, बंद करे ते द्वार यमनियम करून।।

उदासीन जो स्वतःच्या देहाबद्दल, साक्षीमात्र तो त्याच्या संपत्ती बद्दल।
समचित्त तो इष्ट अनिष्ट असता घडत , समवृत्ती राखी सुखदुःखा बद्दल।।

अनन्यपूर्ण अव्यभिचारणी, अशी भक्ति माझ्या ठिकाणी।
आवडे रहाणे एकांत प्रदेशात, परि न आवडे जनसमुदायात।।

निश्चय केला काया वाचा मनाने, जगात काही न चांगले माझ्याहून।
अर्पण केले मन अनन्यभावाने, तो ज्ञानी भक्त माझे विश्राम स्थान।।

ब्रह्मज्ञानावाचून सर्व अज्ञान, असा मनाचा निश्चय।

रत होऊन अध्यात्मज्ञानात, परमात्मा जाणे एकमेव अद्वितीय।।

अध्यात्मज्ञानावरच लावी मन आणि बुद्धी, मानी ऐवढे एकच ज्ञान आहे सत्य।
बाकी विषयाचे ज्ञान निव्वळ भ्रम, असा बुद्धीचा दृढ निश्चय।।

ज्ञानाचा करूनही आश्रय, न झाला जर ज्ञाननिश्चय।
व्यर्थच ठरेल ते ज्ञान, दृष्टीस न पडले जर ज्ञेय।।

जो प्रतिष्ठेकरिता जगतो, जो इच्छती मान सन्मान।
ज्याला सत्काराचे संतोष, त्यांच्या ठायी नांदे अज्ञान।।

स्वतःच्या अंगाला भस्म चर्चित।
त्याची पूजा करणाऱ्याला फसवित।।
त्याचे आचरण जगाला तापदायक।
विषाप्रमाणे त्याचे संकल्प घातक।।
स्तुतीने तो आनंदाने जाती चढून, निंदेने तो बसे डोळे धरून।
विकारांचा वेग न होती सहन, मनातील गोष्टीची कोणाला देई जाण।।

कमीपणा वाटे गुरूंचे नाव सांगायला, तिटकारा येई गुरू सेवा करायला।
गुरू पासून विद्या संपादन करून, लाज न वाटे त्यांच्यावरच उलटायला।।

ना विहीत कर्म न झाल्याचे दुःख, ना नैमित्तिक कर्म न झाल्याची खंत।
देहाने आळशी अन् मनात भरले विकल्प,

ना वाटे पुण्याची ओढ ना लाजे करायला पाप।।

जो झोपला तरच स्थिर राहती। अथवा सतत करती भ्रमंती।।
ज्याच्या ठायी नित्य चंचलपण। तया ठायी असे अज्ञान पूर्ण।।

अंतःकरण त्यांचे विषयाचे द्वार मुक्त।
जिवंत वा मृत् विषय प्रेम कधी ना सोडीत।।

विषयभोगाच्या प्राप्ती साठी श्रम अखंड।
काम्यकर्माची नित्य असे त्याला आवड।।

मी एकटाच असे श्रीमंत, माझ्याहून श्रेष्ठ कोणीही नसती।
मी विद्वान, मी सर्वगुणसंपन्न, सर्वत्र माझी ख्याती।।

गुणवंतांचा करी मत्सर, विद्येचा बाळगे अभिमान।
चढे तपाने वा ज्ञानाने गर्व, त्याच्या कडे वाढते अज्ञान।।

शरीराचे नित्य नवे मरण, विषयांच्या भ्रांती नसे जाण।
सुखभारात मृत्युची न येई आठवण, बेपर्वा जगे तो असता तरुण।।

चालु सुरळीत आहारनिद्रादी व्यवहार, रोगाची चिंता न करी तोवर।
तो देखील अज्ञानी समजावा, ज्याचे इंद्रिये करी विषय भोगी स्वैर।।

तेच करे जे रूचते शरीराला आणि मनाला।
योग्य की अयोग्य याची पर्वा नसे तयाला।।

आसक्तीने पडला घरादारात गुंतून, स्त्री भोवती फिरे लंपट होऊन।
स्त्रीची मर्जी राखणे हाच विषय, सोडून लोकनिंदा, लाज, नफा, नुकसान।।

भक्ति करि तो माझी, लक्ष सारे विषयाकडे ठेवून।
न झाला जर इच्छित लाभ, देई भक्ति करणे सोडुन।।
जो पळापळ करे सैरावैर, अज्ञानाचा मूर्तिमंत अवतार।
पाहून पवित्र तीर्थस्थाने जो कंटाळती, अज्ञानी तो करे व्यभिचारी भक्ति।।

कर्मकांडाची त्याला जाण, सर्व शास्त्रात तो निपुण।
अध्यात्म ज्ञान सोडून, बाकी सर्व त्याला ज्ञान।।

जाणता ते ज्ञेय मोक्ष पावतो मनुष्य।
जे सत् ना असत्ते अनादि ब्रह्म होय।।

त्या ब्रह्माचे ज्ञान होता, काही कार्यच नाही उरत।
सनातन ते परब्रह्म नाव प्राप्त, पदार्थाकर होऊन असे सर्व जगात।।

विश्बाहू ते विश्वाचा आधार, सर्व क्रिया होती त्याच्या सत्तेने।
एकाच वेळी सर्व ठिकाणी ते, विश्व व्यापिले त्यांच्या स्वरूपाने।।

विश्वाचा द्दष्टा ते उजळून टाकली विश्वाला तेजाने।
ते असे विश्वमूर्धा नांदे सर्वांच्या मस्तकावर आत्मसत्तेने।।

सर्वेंद्रियरहित सर्वासक्त। सर्व धारण करणारा सर्वकृत।।
करी सर्व गुणांचे पालन। परि असे ते निर्गुण।।

सर्व भूतांच्या आत ही आहे बाहेर ही, अचल ही आहे आणि चर ही।
जाणायला अशक्य अतिसूक्ष्म असल्याने, जवळही आहे आणि दूर ही।।

ते स्वरूपतः असे अविभक्त, भूतमात्रांमध्ये एकरूपतेने व्याप्त।
एकसारखेच असे ब्रह्म अखंड, उत्पत्ती स्थिती लय या तीनही स्थितीत।।

जे ब्रह्मज्ञान, तेच ज्ञाता, ज्ञेय, तेच ज्ञानाचे स्थान व्हायचे प्राप्त।
त्यांच्या ठिकाणी नसे द्वैत, ते सर्वांच्या हृदयी वसत।।

ब्रह्माचे सांगितले प्रकार चार, क्षेत्र, ज्ञान, ज्ञेय, अज्ञान।
परि न होई जर तुला आकलन, ऐक सर्वांगाने करूनी कान।।

प्रकृती म्हणजेच क्षेत्र पुरूष म्हणजेच क्षेत्रज्ञ, पुरूषाची चाले सत्ता, प्रकृती क्रियेचे कारण।
प्रकृतीपासून झाली धर्माची उत्पत्ती, तिच्या पासूनच इंद्रिये, अंतःकरण, विकार अन् त्रिगुण।।

इच्छा आणि बुद्धी करी अहंकार उत्पन्न, प्राप्त करावयाची इच्छित वस्तु म्हणजे कारण।
त्यासाठी करायचा उपाय म्हणजे कार्य, कर्मेंद्रियाचे व्यापारास कर्तृत्त्व ऐसे जाण।।

ऐसे हे कार्य, कर्तृत्त्व, कारण, प्रकृती असे तयाचे मूळ, तु जाण।
उत्कर्ष तैसाच उमटेल गुण, सुखदुःख प्रकृती पासून उत्पन्न।।

पुरूष प्रकृतीच्या ठायी स्थित, भोगी प्रकृतीचे तो त्रिगुण।
गुणांच्या ठायी ही आसक्ती, पुन्हा जन्मास येण्याचे कारण।।

सृष्टीची उत्पत्ती आणि लय करे प्रकृती, कार्य तिचे पुरूषाच्या सत्तेने चालती।
प्रलयकाळी पुरूषात सर्व लय होती, हाच तो पुरुष ज्याला परमात्मा म्हणती।।

जो ह्या पुरूषाला जाणती, जाणे गुणांसह वर्तमान प्रकृती।
कसा का वागे ना तो, पुन्हा न जन्म घेती।।

काही करती परमात्म्याची ओळख, मनन निदिध्यासनादि ध्यान योगाने।
काही करी अवलोकन सांख्य योगाने, काही जाती कर्मयोगाच्या मार्गाने।।

जे कोणी असे मंदबुद्धी असमर्थ, परमात्म्यास घ्यावया जाणून।
उपासना करी श्रवण करून, तेही जन्ममृत्यु जातात तरून।।

जी काही वस्तु होते उत्पन्न, क्षेत्र क्षेत्रज्ञ संयोग कारण।
जो सर्वत्र पाही परमेश्वराला, तोचि योग्य पाही तु जाण।।

ऐसे जाणणारा तो ज्ञानी। परमेश्वर पाही सर्व ठिकाणी।।

न करून घेई स्वतःचा घात। उत्तम गतीला होतो प्राप्त।।

कर्म करे प्रकृती आत्मा परि अकर्ता, सर्व प्राणिमात्र असे एकाच आत्मवस्तुत।
परि तो अनादि, निर्गुण परमात्मा, विनाशरहित, असंग अलिप्त।।

सर्वव्यापी आकाश सुक्ष्मत्वाने न होई लिप्त, देहात वसे आत्मा परि क्रियांनी न होई लिप्त।
जैसे सूर्य करे संपूर्ण विश्वाला प्रकाशित, तैसे क्षेत्रज्ञ करे सर्व क्षेत्राला प्रकाशित।।

जयास प्रकृतीच्या मिथ्यत्वाचा बोध, जयाने जाणीला क्षेत्र-क्षेत्रज्ञ भेद।
जाणती तो ऐसे ज्ञानदृष्टीने, मिळती तयास परमपद।।

|| इति त्रयोदशोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय चौदावा

गुणातीतयोग

पुन्हा तेचि, ज्ञानातील उत्तम ते ज्ञान।
सांगती भगवंत श्रीमान, जाणिता दूर झाले बंधन।।

ज्ञानाचा ह्या आश्रय घेऊन, जे झाले भगवंतासमान।
सृष्टी निर्मिता जन्मास न येती, प्रलयकाळी न पावती मरण।।

ऐसी असे ही माया, महद्ब्रह्म जणू योनी।
सर्व सृष्टीच्या उत्पत्तीचे, बीज तिच्या ठिकाणी।।

विश्वाची अशी करून रचना, प्रसवूनी प्रकृती झाली माता।
तिये जे ही कार्य केले, साह्य करी पिता परब्रह्माची सत्ता।।

त्रिगुण हे सत्व, रज, तम, प्रकृती देई त्यांना जन्म।
सत्त्व उत्तम, रज मध्यम, तमोगुण असे अधम।।

अमिषाला मासा पडता बळी, धीवर तत्क्षण गळ आवळी।
जीवदशेत आत्मा येता, खेळ गुणमायेची खेळी।।

निर्मल जरी सत्वगुण, आमिष दाखवी सुख आणि ज्ञान।

अडकून बसला जीवात्मा, जैसा असे कोणी हरिण।।

ज्ञानाने झाला अहंकार, आत्मसुखाचा पडला विसर।
माझ्यासारखा सुखी मीच, ऐसा चढला गर्व फार।।

अवगत त्याला व्यवहार ज्ञान, यज्ञ विद्या आणि स्वर्गाची जाण।
म्हणी मज सम न कोणी ज्ञानवान, चातुर्यचंद्राचे मी योग्य स्थान।।

जीवाचे करी नित्य रंजन, म्हणून म्हणती रजोगुण।
अभिलाषा ठेवी चिरतरुण, परी मध्यम असे हा गुण।।

वाढता विषयाची आवड, दुःखही वाटे गोड।
मिळाले जरी इंद्राचे ऐश्वर्य, परि ते ही वाटते थोडं।

आजचे सर्व खर्च केले, उद्या जर काही न उरले।
काय करावे प्रश्न पडले, म्हणूनी भव्य धाट मांडले।।
देह त्यागूनि स्वर्गात जावेत, परी तेथे काय खावे।
करावया मग त्याची सोय, यज्ञयागाच्या मागे धावे।।

ऐसा चंचल रजोगुणी, तया सम नाही कोणी।
जैसे मासा वा कामिनी, वा कडकडणारी वीज गगनी।।

देहाहून वेगळा जरी, परि गुंतला देहात।

करी व्यापाराचा खटाटोप, अडकला तृष्णेचा पाश गळ्यात।।

व्यवहार सारे मंदावले, रात्री काळे मेघ दाटले।
ऐसा मोहरूपी तमोगुण, त्याने बुद्धी झाकले।।
झोपच असे तया अतिप्रिय, स्वर्ग सुखही वाटे न्यून।
लाभले तरी ब्रह्मदेवाचे आयुष्य, तरी वाटे राहावे झोपून।।

निद्रा, आळस, आणि प्रमाद, तमोगुणाच्या तीन असे दोऱ्या।
आत्मा शुद्ध निरुपाधिक जरी, जखडून ठेवी त्याला साऱ्या।।
सत्व, रज, तम, त्रिगुण कैसे येईल न कोणाला ठाव।
जो बळावेल तैसा वागेल, ज्याचा त्याचा जैसा स्वभाव।।

दुसऱ्यांचे कैसे का वागणे, त्यांच्या स्वभावा प्रमाणे।
परि नसे शक्य तया बदलणे, वा स्वतः मुखवटा चढवणे।।

मन, बुद्धी, चित्त, अहंकार, कर्मेंद्रिय, ज्ञानेंद्रिय, आणि पंचप्राण।
स्वभाव जीवाचा ह्यांचे मिश्रण, त्रिगुणांची असे खाण।।

सात्विक असला स्वभाव जरी, प्रसंग बिकट येता परि।
न कळत होई संतप्त, तमोगुणाची चढे स्वारी।।

जीव जन्माला रजाने युक्त, कामना, इच्छा, वासना मनात।

एका जागी बसेना स्वस्थ, नित्य गुंतला नव्या संकल्पात।।

प्रबळ होता सत्त्वगुण, नाम उपासनेत रमले मन।
परि एकचि असे कामना, मिळावे सुख आणि ज्ञान।।

वृद्धिंगत होता सत्त्वगुण, सर्वांगी होई ज्ञान उत्पन्न
कर्माभिलाषा लोभ लालसा, ह्यांची वृद्धी करे रजोगुण।।

अविवेकाने जीवाचे वागणे, प्रमाद आणि मोहाचे वाढणे।
तमोगुण वाढला असता, त्याची असे ही लक्षणे।।

वासना साऱ्या एकत्र येती, मन प्रपंचामध्ये न धावती।
मन विषयातून विटून जाती, सत्त्वाची लक्षणे ऐसी दिसती।।

रजोगुणाच्या कार्याचा धुमाकूळ, गुंतला शरीररूपी हा गांव।
वाटोळं फिरवी सारं जसं वावटळ, विषयभोगाकडे इंद्रिये घेई धाव।।

नित्य तया सबाह्यांतरी, अविवेकचि असे शरिरी।
मूढपणे लागे व्यवहारी, होता तमोगुणाची स्वारी।।

ह्याहून वेगळे काय कल्याण, ज्याचा बळकट नित्य सत्त्वगुण।
निश्चित सद्गती प्राप्त होणं, सत्त्व वृद्धि येता मरण।।

रजोगुण झाला असता उन्नत, मृत्यू आला मग जर अशात।
पुन्हा रजोगुणाने पूर्ण व्याप्त, जन्म घेई मनुष्य योनीत।।

तमोगुण जातो जेव्हा वाढत, त्यातच जर झाला देहांत।
पशु वा पक्षी, झाडं वा कृमी, होतो तो पुढील जन्मात।।

सत्त्वगुणापासून ज्ञान, लोभ रजोगुणापासून।
प्रमाद, मोह आणि अज्ञान, उत्पन्न होई तमापासून।।

नभी उगवला नारायण, रात्र सरून आला दिन।
तैसे ज्ञानाचे जे कारण, तेचि केवळ सत्त्वगुण।।

आत्मस्वरूपाचे विस्मरण, द्वैताचे असे ते कारण।
तैसाचि असे रजोगुण, साऱ्या लोभाचे कारण।।

प्रमाद, मोह, अज्ञान, दोष सारे ते मलिन।
तयाचे जे मूळ कारण, वारंवार हा तमोगुण।।

उत्तम मध्यम अधोगति, भेद दाखवी गुणवृत्ती।
त्यागली जर गुण दृष्टी, ब्रह्म वस्तु शुद्धच दिसती।।

आश्चर्य हे विशेष जाण, देहास त्रिगुणाचे बंधन।
परि कमी न होती, जीवाचे सहज मुक्तपण।।

पाहता मुळस्थानावरून, आत्मा म्हणे घ्यावे जाणून।
मी साक्षी मी अकर्ता, कर्म सारे करती त्रिगुण।।

मी दाखवी गुण, वाढवी गुण मी।
गुणांचा निरास होता उरतो केवळ मी।।

ज्याला अचूक असे जाण, परब्रह्म असे हे निर्गुण।
गुणातीत तो पुरुष, तोचि ज्ञानाचे भूषण स्थान।।

जो ज्ञानी मद्रूप झाला, मग देहात जरी असला।
त्रिगुणांच्या तावडीत तो, परि कधी न सापडला।।

स्वस्वरूपाशी तो समरस, देहधर्मात नाही तया रस।
देहाशीच त्यांचे काम, गुणातीत नसे तया वश।।

ऐसा तो आत्मज्ञानवंत, राही जरी तो देहात।
तो त्रिगुण बंधन मुक्त, म्हणून म्हणतात गुणातीत।।

न तया काही कर्तेपण, न चढे कुठला अभिमान
न घडले कुठले कार्य जरी, न होई तयाची बुद्धी खिन्न।।

ऐसी मूर्ती गुणातीताची, असे मूळतः ती ज्ञानाची।
काय गरज सत्त्व शास्त्राची, समुद्राला गरज काय पावसाची।।

गुणांचे कार्य आणि गुण, अवघेचि आहे आपण।
गुणांच्या उत्कर्षाने म्हणून, चित्त तयाचे असे उदासीन।।

देहातील प्राण देहाविषयी, अतिथी ब्राह्मण घराविषयी।
चौकातील खांब रस्त्याविषयी, तैसा तो उदासीन गुणांविषयी।

भक्तांना असो वा अभक्तांना, देव समान देतो सर्वांना।
तैसे गुणातीत समतोल, मानतो तो सुखदुःखांना।।
आत्मस्वरूपाच्या ठायी, जो बैसला निश्चयी।
तयाच्या देहाच्या ठिकाणी, सुखदुःख समान होई।।

निंदा असो स्तुतीचा काही, परिणाम त्यावर होत नाही।
सूर्याच्या घरी नसे ओळख, अंधार वा दिव्याची काही।

ऐसे ज्याचे आचरण, खरोखर असे साम्यपूर्ण।
आणिक काय करावे कथन, तोचि गुणातीत जाण।।

जो अव्यभिचारी अभेद भावनेने, उपासना करीत जो भक्तियोगाने।
तया शक्य असे सहजपणे, त्रिगुणांचे पाश ते जाळणे।।

तैसे हे विश्वचि अवघे, मत्स्वरूप ते समजावे।
चंद्राला बघावयास लागे का चंद्रकला वेगळे करावे।।

विश्वपण दूर करावे, स्वस्वरूपासि पहावे।
परि तैसा विभक्त नसे, विश्वासह सारे मद्रूप जाणावे।।
मत्स्वरूप जाणावे विश्वमूर्ती, तिज म्हणती अव्यभिचारी भक्ती।
परि का कोणी भेद करती, त्यांची असे व्यभिचारी वृत्ती।।

भेद बुद्धी त्याग करून, अभेद चित्ताने घ्यावे जाणून।
आपल्या सकट आपण, वेगळे नाही मत्स्वरूपापासून।।

सोऽहम् वृत्ती अभेद, ऐसे भक्त आणि भगवंत।
ऐसे नांदू लागता मग, होई लीन स्वस्वरूपात।।
विरले भगवंताचे परत्व, तैसेचि भक्ताचे अपरत्व।
उरले मग केवळ दोघांत, स्वयंसिद्ध ते ऐक्यत्व।।

त्रिगुणांना जिंकतो ऐसा भक्त, मग विचार ही नाही राहत।
ऐक्याचा अनुभव ही नाही उरत, ऐसे भजता होई ब्रह्मत्व प्राप्त।।

ज्याला सायुज्य म्हणतात, ऐसे हे असे ब्रह्मत्व।
चौथा पुरुषार्थ ऐसे, त्याचे असे नाव।।

अविकारी अद्वितीय अमृत, धर्मरूप, सुख, शाश्वत।
तोचि असे केवळ एकच, ज्याला ब्रह्म म्हणतात।।

ऐसे हे ब्रह्म नित्य निष्कंप, प्रकट अन् धर्मरुप।
अमर्याद अन् अद्वितीय, सुख ते असे अमाप।।

जसा गुढ जो परमार्थ, समजावूनि सांगितला सार्थ।
भक्तांचा कैवारी तो भगवंत, त्याचा एकही शब्द नसे व्यर्थ।।

|| इति चतुर्दशोऽध्याय ||

ज्ञानेश्वरी अध्याय पंधरावा

ज्ञानेश्वरी अध्याय पंधरावा

पुरुषोत्तमयोग

अश्वथ वृक्ष जणु संसाराच रूप।
मुळं वर, खाली फांद्या खुप।।

संसारवृक्षांची पाने वेद।
वृक्षाला जाणी तो जाणी वेद।।

जरी हा वृक्ष असे उर्ध्वमुळ।
खाली ही मूळं असे पुष्कळ।।

फांद्या विस्तारल्या वरच्या बाजूने।
चौफेर फोफावला वृक्ष वटाप्रमाणे।।

माया सत् ही नाही असत् ही नाही, विचारांपुढे ती मुळीच टिकत नाही।
ती माया संसारवृक्षाचे बीज, ती माया ब्रह्माच्या ठिकाणी असून ही नाही।।

निर्गुण ब्रह्माचा ठिकाणी, माया झाली उत्पन्न।
संसारवृक्षाच पहिलं मूळ ती, ब्रह्मालाच करी आच्छादन।।

बीजांकुर म्हणा वा सुषुप्तिदशा, पूर्ण अज्ञान अशी जी निद्रावस्था।

जागृति व स्वप्न या दोन अवस्था, सुषुप्तीरुपी अंकुराची फलावस्था।।

अंकुरांचे घोस दिसू लागती, जेथे ब्रह्म जे भववृक्षाचे मूळ उर्ध्व।
त्यात चिद्वृत्ति ती माया, त्या वृक्षाचे प्रथम पान महत् तत्त्व।।

महत् तत्त्वापासून झाले उत्पन्न।
पंचमहाभूते, अहंकार, बुद्धी, मन।।
हे सर्व मिळून बनतो संसार।
ब्रह्माचा पसारा संसारवृक्षरूपी विस्तार।।

संसारवृक्षाची जी स्थिती, क्षणाक्षणाला ती बदलती।
ह्या प्रपंचवृक्षाची नसते शाश्वती, म्हणून त्यास अश्वत्थ म्हणती।।

संसारवृक्षाच्या फांद्या खालीवर पसरल्या, त्रिगुणांनी झाल्या मग त्या वृद्धिंगत।
विषयरूपी पानांनी त्या भरल्या, कर्मानुबंधी मूळे गेली मनुष्य लोकात।।
वर्णन केले परि स्वरूप खरे न कळून येती।
ह्या वृक्षाला ना आदि, ना अंत ना स्थिती।।

नसलेला संसारवृक्षाला बळ देती अज्ञान।
करावे तयाचे आत्मज्ञानरूपी शस्त्राने छेदन।।

परिपूर्णत्वाने असणे आत्मस्वरूपचे पाहणे, आपले जे स्वरूप आपण द्वैतावाचून पाहणे।
आणखी एक खुण आत्मवस्तु ओळखायची, ज्याच्याशी ऐक्याने पुनर्जन्म प्राप्त न होणे।।

सदैव तत्पर अध्यात्म ज्ञानाविषय, ज्यांनी संगदोष जिंकला, अभिमान मोहरहित।
विषय वासना संपल्या, जे द्वंद्वविमुक्त, त्यांना अविनाशी पद होती प्राप्त।।

सूर्य न करे ते अविनाशपद प्रकाशित, चंद्र वा अग्नी न करू शके तया प्रकाशित।
त्या ठायी गेलेले लोक न येती परत, ऐसे माझे निजधाम श्रेष्ठ अत्यंत।।

जसा पाण्याला स्पर्श ही करता, चंद्र होई पाण्यात प्रतिबिंबित।
भासे सापडलो मी जीवालोकी व्यापारात, परि अनादिपणा माझा नाहिसा न होत।।

शुद्ध परब्रह्म मायेशी ऐक्य पावून, आपल्या ठिकाणी शरीरधर्म असे पाहत।
घेऊन सोबत सहा ज्ञानेंद्रिये मनासहित, देहाभिमानी जीव विषय भोगीत।।
जीव जेव्हा जातो शरीर सोडून, पुन्हा जन्म घेई दुसरे शरीर घेऊन।
वाऱ्याबरोबर सुगंध जातो दूर पुष्पांपासून, जीव जाई इंद्रियांना बरोबर घेऊन।।

शरीरात असतांना वा सोडून जातांना, घेता विषय भोग वा असता सुखादि गुणांनी युक्त।
अज्ञानी आत्म्याला वेगळा नाही पाहत, परि ज्ञानी त्याला अकर्ता असे जाणत।।

प्रयत्न करणारे योगी पाही, आत्मा जो बुद्धीच्या ठिकाणी स्थित।
त्यांना त्याचे दर्शन नाही होत, जे पुरुष अविवेकी अशुद्ध चित्त।।

जे तेज सूर्याच्या ठिकाणी असून, संपूर्ण जगाला करे प्रकाशमान।
चंद्राच्या व अग्नीच्या ठिकाणी जे तेज, ते मीच आहे ऐसे जाण।।

सामर्थ्याने करी मी भूतांचे धारण, पृथ्वी मध्ये मी प्रवेश करून।
सर्व औषधीचे करी मीच पोषण, रसात्मक असा मी चंद्र होऊन।।

प्राण्यांच्या देहात जठराग्नी होऊन, सहाय्यास घेऊन प्राण व अपान।
शुष्क, स्निग्ध, सुपक्व, विदग्ध, पचवितो ऐसे चार प्रकारचे अन्न।।

रात्र न् दिन मी सर्वांच्या हृदयात, ज्ञानयोगाने वा राहता संतसंगतीत।
करता गुरू सेवा होऊन वैराग्य मुक्त, अज्ञान जाऊन स्थिर तो आत्मस्वरूपात।।

स्वरूप माझे झांकले जाऊन, प्राण्यांना संसार विषय असे दिसत।
जीवाच्या ज्ञानाला मीच मूळ कारण, सर्व माझ्या सत्तेने असे घडत।।

जीवाची जाणीव आणि नेणीव, मीच असे हेतू ज्ञानस्वरूप।
वेदांना ही यथार्थ ज्ञान जाणण्यास, ज्या शाखा फुटल्या वर्णती मत्स्वरूप।।

संसार रूपी ह्या नगरात। केवळ दोन पुरूष राहतात।।
एक ज्ञानदृष्टीहीन देहभ्रांत तो क्षर। दुसरा सर्वांगाने परिपूर्ण तो अक्षर।।

सर्व साकार जगात स्थूल सूक्ष्म देहात, त्या आकाराने नटले चैतन्य।
त्याप्रमाणे उपधिमुळे द्वैत भासते, द्वैत नसताना अद्वैत आत्मचैतन्य।।

जो असे स्वस्वरूपाच्या विस्मृतीने, भूतमात्रांच्या गुणधर्माच्या तंत्राने।

जरी परिपूर्ण आत्मस्वरूपाने, उपाधिशी तारतम्य पावल्याने।।

त्यावर क्षर असा खोटा आरोप, आता अक्षर पुरूष जाण।
जो शुद्ध ज्ञानाने न होई एकरूप, विपरित ज्ञानाने न घेई दूजेपण।।
ब्रह्मप्राप्तीच्या खालची अवस्था आत्मघन सुषुप्ती, अक्षरपुरुष पुन्हा जर न आला अवस्थेला।
ब्रह्मभाव म्हणता आले असते त्या स्थितीला, अक्षरपुरूष हेच मूळ संसार वृक्षाला।।

ज्याला परमात्मा असे म्हणतात, वेगळा तो या दोन पुरूषाहून।
धारण करि त्यांना हा अविनाशी ईश्वर, त्रैलोक्यात प्रवेश करून।।

मी क्षराहून निराळा, मी अक्षराहून उत्तम।
लोकांत वा वेदांत, माझेच नाव पुरूषोत्तम।।

जो मला भजतो मला पुरूषोत्तम जाणून।
आपल्या सकट सर्व मत्स्वरूप जाणून।।

जाणी जो हे शास्त्र अत्यंत गुह्य।
तो पुरुष होई सर्वज्ञ व कृतकृत्य।।

|| इति पंचदशोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय सोळावा

दैवसुरसंपद्विभाग

मागे सांगती हरि गुह्यात गुह्य ज्ञान, आता दैवी संपत्ती जे सुलभ श्रेष्ठ साधन।
देई अज्ञानाची निवृत्ति व मोक्षाची प्राप्ती करून, वर्णती श्री दैवी संपत्तीचे सव्वीस गुण।।

सर्वश्रेष्ठ हा अभय गुण, त्याला असे मुख्य स्थान।
जेथे न होई अहंकार उत्पन्न, त्याने भय बाळगणे द्यावे सोडून।।

सर्वां ठायी आत्मभाव वाढीस लागे, जेव्हा अद्वैतभावाच्या विकासाने।
भयाला दूर सारून मिळे अभय , ते होई साध्य सम्यक ज्ञानाने।।

जी अलिप्त संकल्पविकल्पा पासून, रज तम गुणांचे ओझे टाकून।
आत्मचिंतनाचे प्रेम भोगणारी बुद्धी, तिला सत्वशुद्धी ऐसे जाण।।

यज्ञकर्म करणाऱ्यानी द्यावी अग्नीमध्ये पूर्णाहुती,
स्थिर करावी आवडीच्या साधनाच्या ठायी चित्तवृत्ती।
विकल्परहित, अनन्य होऊन ज्ञानयोगाचा ठायी,
दैवीसंपत्तीचा तिसरा गुण ज्ञानयोग व्यवस्थिती।।

काया वाचा मनाने यथाशक्ती धनाने, कोणाला मदत केल्याशिवाय न राहणे।
अतिथीला उपभोग देणे मनाप्रमाणे, ऐसी असे उदार दानाची लक्षणे।।

न होऊ देई विषयमात्राचा उपद्रव, इंद्रियांना घाली प्रत्याहाराचे बंधन।
दहाहि इंद्रियांचे वैराग्याने रक्षण, ऐसे दम जो प्रवृत्ति न होऊ देई उत्पन्न।।

योग्याच्या प्राण निरोधनापेक्षा कठीण, अशी व्रते आचरती रात्र न् दिन।
क्षणभरही ज्याला नसे विश्रांती , ऐसे स्वरूप त्याला दम असे म्हणती।।

सर्वांनी आपापल्या वर्णाश्रमधर्मानुसार,
यज्ञाचरण करावे पाहून आपापला अधिकार।
देहाभिमानाने न होऊ देता अहंभाव निर्माण,
अशा लक्षणांनी युक्त यज्ञ असावा शास्त्राज्ञेनुसार।।

आरसा जैसे स्वच्छ करावा, स्वतःस पाहण्यासाठी।
वेदश्रृतिंचा करावा अभ्यास, ईश्वराचा साक्षात्कार होण्यासाठी।।

वेदातील ब्रह्मसुत्र ब्राह्मणांनी, अधिकारपरत्त्व स्तोत्रे इतरांनी।
वा नाममंत्राचा जप करावा, ऐसे स्वाध्याय करावा सर्वांनी।।

देह आणि जीव दिसती जरी एकरूप, वियोग करी त्यांचा आत्मानात्मा विवेक।
आत्मप्राप्ती साठी जो विवेक होई उत्पन्न, हाच तप या शब्दाचा अर्थ वास्तविक।।

असले जरी भूतमात्र भिन्न भिन्न। प्रत्येकाच्या ठायी चैतन्य समान।।
प्रत्येक प्राणीमात्राशी सौजन्य मनात। त्यालाच सर्व आर्जव म्हणतात।।

जगाला सुख व्हावे ह्या उद्देशाने, शरीराने, वाचेने आणि मनाने।
असे ते अहिंसेचे स्वरूप, ऐसे जे व्यवहार करणे।।

आपल्या खरेपणाच्या सामर्थ्याने, ब्रह्मतत्त्वाची उकल करणे।
मधुर, गौरवास्पद, विकारांपासून अलिप्त, ऐसी जाण सत्याची लक्षणे।।

प्रयत्न करूनही मनात, क्रोध उत्पन्न नाही होत।
त्यास अक्रोधत्व म्हणतात, मनाची ही अवस्था शांत।।

त्याच्या ठायी दिसे सर्व संसाराचा त्याग, ज्या विवेकीपुरूषाने देहाहंकार टाकला।
यज्ञस्वरूप भगवान श्रीकृष्ण म्हणती, त्याग म्हणावे अशा अवस्थेला।।

ज्ञेयाला जिरवून लयाला जाती, जेव्हा दोन्ही ज्ञाता आणि ज्ञान।
अशी जी स्थिती म्हणजे शांती, स्वस्वरूपात स्थिर सर्व दिशा व्यापून।।
दुसऱ्याच्या अंगी जर काही दोष, आपल्या दृष्टीने नाहीसे करून।
खेद न देई तयाचा पापाचार उच्चारून, ऐसे हे अपशून्याचे लक्षण।।

दुसऱ्याच्या दुःख निवारणार्थ, आपले सर्वस्व करे अर्पण।
नसे भेदभाव थोर वा लहान, अशी असे दया तु जाण।।

सहज कौतुकाने सुद्धा, जीव विषयांची इच्छा न करती।

तिलाच अलोलुपत्व म्हणती, किंवा तिच असे अनासक्ती।।

भूतमात्राविषयी ज्याच्या अंतःकरणात, असे नित्य प्रेम आणि मृदुता।
त्यास मार्दव म्हणतात, जगणे जगाच्या कल्याणाकरिता।।

नामरूपाचा अंगिकार देहबंधनात पडून, दुसरी कुठली गोष्ट नसे लाजिरवाणी याहून।
साधुपुरूषांना खंत आणि लाज वाटे, हीन दिशेला आणणारे शरीर धारण करून।।

दशेंद्रिये स्तब्ध होती योगसाधनाने, आपल्या सर्व क्रिया थांबवून।
आणि मनाचे करता नियमन, त्यास अचापल्य असे जाण।।

आत्मप्राप्तीची ज्याला लागे तळमळ, विषाप्रमाणे तो विषयांचा त्याग करून।
परमेश्वरात सहजपणे धाव घेई अंतःकरण, तेच अध्यात्मिक तेज असे जाण।।

शरीर सहन करे केसांच्या भाराला, परि त्यांचे भान नसे त्या शरीराला।
सहनशील मी सर्वात श्रेष्ठ ऐसा नसे गर्व, क्षमा समज तु ह्या गुणाला।।

अनावर झाल्या वृत्ती, वा रोगादि भोग, प्रियजनांना वियोग, अप्रियांशी योग।
एकाचवेळी आले ऐसे वेगवेगळे प्रसंग, सर्व सहन करून धैर्य टाके मागं।।

ज्ञान आणि योगाचे आचरण, ईश्वर प्राप्तीचे मार्ग दोन।
चित्तात चलबिचल परि धैर्य टिकून, त्यास धृति ऐसे नित्य जाण।।

सोन्याचा कलश स्वच्छ करून, शुद्ध गंगेचं पाणी ठेवावे भरून।
ऐसे शुद्धतेचे स्वरूप जे शौर्य, तु घ्यावे नित्य जाणून।।

अविद्येच्या बंधकाला मुक्त, संकटग्रस्तांना संकट मुक्त,
दुसऱ्यांचे सुख वाढवित प्रवेशती आत्महितात।

न करी कधी ही स्वहितासाठी दुसऱ्यांचे अहित,
त्याच्या ठायी अद्रोहत्व ज्याच्या मनात ऐसा विचार ही न येत।।

मान सन्मान मिळता लोकांकडून, ऐसे होता तो जाई संकोचून।
हेच अमानित्व ऐसे वर्तन, ऐसे हे सव्वीस दैवी गुण।।

दंड, दर्प, अभिमान, क्रोध, निष्ठुरता, अज्ञान।
ऐसे असुराचे गुण, आता अर्जूना जाण।।

स्वधर्म जर दिमाखाने केला घोषित, तारक तो धर्महीं पतनाला कारणीभूत।
ऐसे अवडंबर माजविता धर्म अधर्म होत, हाच तो आसुरी गुण ज्याला दंभ म्हणतात।।

एखाद्या दिवशी मिळणाऱ्या, परान्नावर दरिद्री पुरूष होती उन्मत्त।
स्त्रिया,धन,विद्या,स्तुती,बहुमान यांनी होतो मस्त, ऐसा असे तो दर्प, प्राप्त संपत्तीने उन्मत्त।।

ईश्वर भक्तीने न् गुणगान ऐकून, असुरांच्या मनात मत्सर होई उत्पन्न।

गर्वाच्या मदाने ईश्वराचे नावही न होई सहन, असा हा आसुरी गुण असे अभिमान।।

दुसऱ्याचे विद्या, विनोद, ऐश्वर्य, सौभाग्य, दिसता त्याचा संताप जाती वाढत।
दुसऱ्याचे सुख विषासमान वाटत, त्याला क्रोध असे म्हणतात।।

त्याचे मन घातक संकल्पाचे वस्तीस्थान, दुसऱ्यांना क्लेशकारक अंतर्बाह्य व्यवहार।
ऐसा तो अन्य, कठीणपणाची मूर्ति असून, ऐसा हा असूरी गुण असे निष्ठूर।।

योग्य-अयोग्यतेची निवड नाही करत, कर्तव्य-अकर्तव्य विचार नाही सुचत।
पापपुण्यादि भेदाभेद नाही मानत, त्यास अज्ञान ऐसे म्हणतात।।

दैवी संपत्ती मोक्षाला कारण, आसुरी संपत्ती बंधनांचा कारण।
परि तु जन्मतःच युक्त दैवी संपत्तीने, शोक करण्याचे नसे काही कारण।।

आसुरी मनुष्याला प्रवृत्ती वा निवृत्ती, पवित्रता, सदाचार, वा सत्य, नसे जाण।
जगत् असत्य, कारणशून्य, ईश्वरहीन मानती, संयोगातून होई उत्पन्न, कामच त्यांचे कारण।।

ईश्वराचा तिरस्काराची केवळ बडबड, अंगामध्ये उघडपणे भरून पाखंड।
आसुरी मनुष्यांचा भरणा वा उदय, म्हणजे जणु असे लोक क्षय।।

नित्य असे अपूर्ण तो पुरुष, जो दंभ, मान आणि मदयुक्त।
अविवेकाने अशुद्ध निश्चय स्विकारून, अनर्थ हेतु नियम पाळण्यास होती प्रवृत्त।।

मरणाने ही न संपणारा विषय, कामोपभोग हेच अंतिम साध्य।
असा असूरजनाचा मनाचा निश्चय, अन्यायाने करी धनाचा संचय।।

आज हे मिळविले, उद्या ते मिळविन, आज ह्याला मारले उद्या त्याला मारीन।
मी धनवान, कुलीन, माझ्या सम दुसरा कोण, आसुरी जना ठायी अनेक मोह होई उत्पन्न।।

विकारांनी भ्रमिष्ट चित्त, विषयभोगात आसक्त,
मोहजालाने व्याप्त, असे असुरजन पडती नरकात।
अहंमन्य, नम्रताहीन, धनमान न् गर्वयुक्त,
दांभिकपणाने अविधीपूर्वक यज्ञ करतात।।

अहंकार, बल, गर्व, काम, क्रोध, मत्सर युक्त।
स्वतःच्या अन् इतरांच्या ठायी , असणाऱ्या माझा द्वेष करतात।।

जन्मोजन्मी आसुरयोनीला प्राप्त होती, आसुरी गुण योगे मिळे अधोगती।
परि ते करावया माझी प्राप्ती, मूर्ख लोक कधीही न झटती।।

काही, क्रोध, लोभ हे तीन प्रकार, आत्म्याचा नाश करणारे नरकाचे द्वार।
ह्यापासून मुक्त पुरूष जातो उत्तम गतीला, करून आत्मकल्याणाचा आचार ।।

त्यागून विधी ज्या शास्त्रानुसार, जो वागी आपल्या इच्छेनुसार।
त्या प्राप्त ना ज्ञान ना गति ना सुख, ज्याला आवडती कामक्रोधादिक विचार।।

कार्य अकार्य कोणते ते जाण, शास्त्रच आहे प्रमाण तु मान।
तयाने सांगितले ते कर्म जाणून, योग्य असे कर तु आचरण।।

|| इति षोडशोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय सतरावा

श्रद्धादिनिरुपणयोग

श्रीकृष्णास विचारती अर्जुन , जे शास्त्राचार देती सोडून।
परि श्रद्धापूर्वक करति यजन, त्यास गति कैसी कर कथन।।

श्रीकृष्ण बोलती पुन्हा एकदा, प्राणिमात्रांची जी स्वाभाविक श्रद्धा।
जैसे ज्याचे असे मूळ संस्कार, सात्विक, राजस, तामसी होती श्रद्धा।।

देवांची उपासना करती लोक, सात्त्विक श्रद्धेने युक्त |
राजस श्रद्धेने युक्त यक्षराक्षसांची, भूतप्रेताची उपासना करी तामस श्रद्धेने युक्त।।

दंभ, अहंकार युक्त होऊन, अभिलाषी आसक्त होऊन।
शास्त्राला जे अमान्य, भयंकर तपाचे करी आचरण।।

तैसेच स्वतःला अन् दुसऱ्यांना, ते जे दुःख देतात।
क्लेश मला तयाचे होतात, ऐसे लोक आसुरी बुद्धीचे असतात।।

सात्त्विक अन्नाच्या केलं सेवन, वृद्धिंगत होतो सत्त्वगुण।
तैसेच रजोगुण अन् तमोगुण, ऐसे आहाराचे प्रकार तीन।।

ऐसे जीव तीन गुणांनी, तीन प्रकाराने वागे तीन प्रकाराचा होऊन।
यज्ञ, तप, दान, यांच्या ही व्यवहारचे प्रकार असती तीन।।

आयुष्य, सत्त्व, बळ, आरोग्य, सुख, प्रिती, जो आहार यांची वृद्धि करीत।
स्निग्ध, मानस आनंद देणारे रसभरीत, असे आहार सात्त्विक लोकांना प्रिय असतात।।

तिखट, आंबट, खारट, रूक्ष, उष्ण, तीक्ष्ण, दाह करणारे।
आहार असे राजस माणसांना प्रिय, केवळ दु:ख, शोक रोग देणारे।।

ज्या अन्नाला तयार होऊन, अधिक वेळ गेला दोन प्रहराहून।
रसरहित, दुर्गंध युक्त, शिळे, उष्टे सदोष, ऐसे तामसी लोकांचे भोजन।।

फलाची आशा न धरता, यज्ञ जे केले विधीपूर्वक।
केलेच पाहिजे कर्तव्य जाणता, ऐसे जे यज्ञ ते असे सात्त्विक।।

यज्ञ केला जो दांभिकपणाने, आणि फलाची आशा धरून।
स्वर्गप्राप्त करण्याच्या इच्छेने, ऐसे राजस यज्ञ तु जाण।।
जे यज्ञ शास्त्रविधीला सोडून, मंत्रहीन, दक्षिणारहित, श्रद्धाविरहित।
ज्यामध्ये न दिले जाई अन्नदान, त्या यज्ञास तामस यज्ञ म्हणतात।।

माता पिता देव ब्राह्मण, आणिक गुरुजनांचे पूजन।
शुद्धता, ब्रह्मचर्य सरळपण, ह्याला शारीरिक तप ऐसे जाण।।

दुसऱ्याला न दुखविता वागणे, सत्य प्रिय हितकर बोलणे।
स्वाध्यायाचा अभ्यास करणे, हे असे वाचिक तप ऐसे श्रींचे सांगणे।।

मन नित्य प्रसन्न, शांतपणा अन् मौन, आत्मसंयमन अन् कल्पना विरहीत अंतःकरण।
अशी जी मनाची शुद्ध स्थिती, त्यास मानस तप म्हणती।।

हे तीन तप केले फलाशा सोडून, युक्त पूर्ण सत्त्वशुद्धीने।
आणि अत्यंत आस्तिक्यबुद्धीने, त्यास सात्त्विक तप म्हणती लोक शहाणे।।

सत्कार वा मान मिळविण्यासाठी, तप दांभिकपणाने जे केले।
जे निष्फळ आणि अस्थिर, ते राजस तप म्हणून प्रसिद्ध झाले।।

जे तप केले मुर्खपणाचा हट्ट करून, अथवा स्वतःला पीडा देऊन।
दुसऱ्याच्या नाशाकरिता केले जाते, तामस तप त्याला म्हटले जाते।।
स्वधर्माने कमवलेल्या धनातून, कर्तव्यबुद्धी केले जे दान,
परतफेडीची अपेक्षा नाही ज्याच्यापासून।
योग्य ऐसे ठिकाण, काल पात्र पाहून,
अशा दानाला म्हणतात सात्त्विक दान।।

जेव्हा देती कोणी दान, उपकाराची परतफेड म्हणून।
फलाशेने वा अतिशय कष्टाने, त्याला म्हणती राजस दान।।

जे दान सत्कार रहित, असे जे अवहेलनापूर्वक।
अयोग्य वेळ, मनुष्य वा ठिकाण, त्याला म्हणतात तामस दान।।

ॐ तत्, सत् ब्रह्माचे निर्देश तीन, नामयोगाने ब्राह्मण, वेद, यज्ञ केले निर्माण।

मोक्षार्थींनी म्हणून यज्ञ, तप, दान, सुरू करावे ॐ अक्षरांचा उच्चार करून।।

फलाची अपेक्षा न ठेवता मोक्षार्थीने।
यज्ञ, तप, दान करावे ब्रह्मार्पण बुद्धीने।।

विविध क्रिया कराव्या द्वैतभाव रहित।
तत् अक्षराचा उच्चार करीत।।

कर्ता ब्रह्मरूप व्हावा म्हणून, सदोष कर्म निर्दोष व्हावे म्हणून।
सत् शब्दाचा करावा उच्चार, अंतरंगाचा विनियोग व्हावा म्हणून।।

यज्ञ, तप, दान ह्यांची जाऊन न्यूनता,
तयाचे कर्म वा परिपूर्णता।

याला ही म्हणती सत्,
जे जीवबंधनाला न उरु देत।।

नामाचा सत् मार्ग टाकून, श्रद्धेचा आश्रय नष्ट करून।
केलेले कर्म तप दान, ते फलरहित त्याला असत् जाण ।।

|| इति सप्तदशोऽध्यायः ||

ज्ञानेश्वरी अध्याय अठरावा

ज्ञानेश्वरी अध्याय अठरावा

सर्वगीतासंग्रहयोग

आता मज सांग केशव, ऐसे म्हणती अर्जुन ।
संन्यास अन् त्यागाचे तत्त्व, वाटे मज घ्यावे जाणून।।

पंडित जन संन्यास म्हणती, काम्य कर्माच्या त्यागाला।
विद्वान म्हणती त्याग, कर्मफलाच्या त्यागाला।।

कोणी म्हणती कर्म असे बंधन, म्हणूनी करवा त्याचा त्याग।
कोणी म्हणती यज्ञ तप दान, या कर्मांचा कधीच करू नये त्याग।।

यज्ञ दान तप ही कर्मे त्याज्य नाहीत, नित्य करावीच आसक्ती अन् फलाशारहित।
आचरती ही कर्मे जे ज्ञानवंत, यज्ञ दान तप करी शुद्ध त्यांचे चित्त।।

दोष नाहिसा होई कर्म जर चालले युक्तिने, योग्य नसे विहीत कर्मांचा त्याग करणे।
तोचि असे तामस त्याग जो केला मोहाने, परि कधीही न जावे त्या मार्गाने।।

कर्मांचा केला जर त्याग, त्रासदायक वाटतात म्हणून।
ऐसा असे हा राजस त्याग, फळांची न होई प्राप्ती हे जाण।।

नित्यकर्म केली आसक्ती न् फलाशा सोडून, ऐसा असे जो काही त्याग।
केले जाती केवळ कर्तव्य म्हणून, त्याला म्हणती सात्त्विक त्याग।।

संशय दूर झालेला बुद्धिवान, त्यागी पुरूष सत्त्वगुण संपन्न।
न अशुभ कर्मांचा द्वेष करीत, न शुभ कर्माच्या ठायी होती आसक्त।।

अशक्य असे देहधारी माणसाला, करणे कर्माचा पूर्णपणे त्याग।
परि त्यास म्हणावे त्यागी, जो करी कर्मफलाचा त्याग।।

अनिष्ट, इष्ट, आणि इष्टानिष्ट, कर्मफळाचे तीन प्रकार।
तयाचा त्याग न करणाऱ्याला, प्राप्त होई मरणानंतर।।

शरीर, जीव, इंद्रिये, निरनिराळे व्यापार, आणिक इंद्रियांची अधिष्ठात्री देवता।
आवश्यक ही पांच कारणे, सर्व कर्माच्या सिद्धी करिता।।

देह कर्माचे पहिले कारण, देहाला म्हणती अधिष्ठान।
सुखदुःख भोगण्या करीता, जीवाला नसे दुसरे स्थान।।
चैतन्यस्वरूपाचे विस्मरण होऊन, मी देह आहे ऐसे मानून।
ऐसे कर्म करी जो तो जीव, असे कर्माचे दुसरे कारण।।

असे बुद्धीचे एकच ज्ञान, बाहेर पसरे इंद्रियांद्वारे भिन्नभिन्न।
अशी ही निरनिराळी ज्ञानेंद्रिये, असे कर्माचे तिसरे कारण।।

प्राणवायुची शक्ती, नावे अनेक, जैसे प्राण, अपान, समान।
भिन्नभिन्न कार्यामुळे झाली भिन्नभिन्न, हेच कर्माचे चौथे कारण।।

इंद्रियांच्या समुदायाच्या अनुकुलतेला, एकच गोष्ट वाटते भूषण।
ती अधिष्ठात्री देवतांची अनुकुलता, असे कर्माचे पाचवे कारण।।

कर्माचा संकल्प होण्यास मन कारण, मग वाणीद्वारे स्पष्ट उच्चारण।
मग कर्मांचे जीवाकडे येई कर्तेपण, कर्माच्या व्यापाराला देहादिक सर्वेंद्रिये कारण।।

शरीर वाचा मन कर्माची असे कारण, शरीरादि कर्मांना हेतू ही तीच असती।
कर्म कार्यांना हेतूची जोड मिळाली असता, सर्व कर्माची होते निर्मिती।।

शास्त्र संमत मार्गाने केले कर्म, ते कर्म पुण्यकर्म म्हणतात।
शास्त्राला न जाणून उत्पन्न कर्म, सशास्त्र झाले तर पुण्यकर्मच होतात।।

असे ज्याची बुद्धी संस्कार विहीत, शुद्ध आत्म्यालाच असे कर्ता समजत।
मूढ समजावा तो जीव, त्याला यथार्थ नाही समजत।।

जो नसे कर्तेपणाचा अहंकार युक्त, ज्याची बुद्धी सदैव अलिप्त।
जो आत्मभावाने असे व्याप्त, कृतीच्या पाप-पुण्याने बद्ध नाही होत।।

ज्ञान, ज्ञाता, ज्ञेय, हे कर्माचे प्रवृत्तीत्रय।
कारण, कर्ता, कर्म, हे तीन कर्म संचय।।

इंद्रियांच्या व्दाराने व्यवहार करून, भोगायला लावी सुखदुःख जे ज्ञान।

नाहिसे होई गाढ झोपी जाता, तो असे ज्ञाता अन् येथे जे सांगितले ते ज्ञान।।

अविद्येने आले जे ज्ञान, उपजताक्षणी वाटे करे तीन।
संपते ज्ञेयाची सीमा गाठून, ऐसे ज्ञान असे सामान्य ज्ञान।।

शब्द स्पर्श, रूप, रस गंध, पाच प्रकारचे असे विषय।
इंद्रिये द्वारा धावणाऱ्या ज्ञानाचा, होई जेथे अखेर तो ज्ञेय।।
शब्दादि पांच विषय हे ज्ञेय, असे ते विषय प्रिय वा अप्रिय।
स्विकार करी विषय असता प्रिय, झिडकारण्यास प्रवृत्त करी अप्रिय विषय।।

ज्ञाता विषयासक्त होऊन, स्वतःला कर्ता समजून।
ज्ञानाला करी कारण, ज्ञेय मग जाई कार्य होऊन।।

कर्माचा करण्या त्याग, वा स्विकार करण्याकरिता।
इंद्रियांचे नेतृत्व घेई ज्ञाता, त्यालाच मग म्हणतात कर्ता।।

सांख्य शास्त्री म्हणती, सत्व, रज, तम ह्या समान।
ज्ञान कर्ता कर्म हे तीन, गुणभेदाने प्रकार तीन।।

सर्वां ठायी एकच अविभक्त आत्मा, जरी सर्व भूते दिसती भिन्न।
ज्याच्या योगाने ऐसे पाहतो, तेचि असे सात्त्विक ज्ञान।।

ज्यामुळे सर्व भूतांठायी, पदार्थ दिसे भिन्न।
असा होई भेदाकारक बोध, ते होय राजस ज्ञान।।

एकाच कार्याच्या ठिकाणी, तेच सारं सर्वस्व समजून।
प्रमाणरहित, तत्त्वार्थशून्य, क्षुद्र, जे ज्ञान ते असे तामस ज्ञान।।

आसक्तिरहित, प्रीति वा द्वेष रहित,
फलाशारहित, केले जे कर्म विहीत।
पूर्णत्वाचा न आनंद, न अपूर्णाचा खेद करीत,
असे जे कर्म त्याला सात्त्विक कर्म म्हणतात।।

अहंकार बुद्धिसह प्रयत्न करून, अथवा फलाची इच्छा धरून।
ऐसे केले जे काही कर्म, त्यास राजस कर्म ऐसे जाण।।

भावी परिणाम, हानी, हिंसा, सामर्थ्य, न करता यांचा विचार।
अविवेकाने केले जर कर्म, तामस कर्माचा वाढत जाई भार।।
आसक्तीरहित अहंकार रहित, धैर्य, उत्साहाने जो युक्त।
फलाशा विकाररहित, त्याला सात्त्विक कर्ता म्हणतात।।

कर्मफलेच्छुक, लोभी, विषयासक्त, परपीडक, अपवित्र, हर्षशोक युक्त।
ऐसा असे जो कर्ता, त्याला राजस कर्ता म्हणतात।।

आळशी, सदा असंतुष्ट, दीर्घसूत्री, गर्वयुक्त, बुद्धी नियमरहित, शास्त्र संस्कार रहित।

ना आवडे दुसऱ्याचे बरे वा हित, त्यास तामस कर्ता म्हणतात।।

कर्तव्य-अकर्तव्य, भय-अभय, बंध मोक्ष, प्रवृत्ती निवृत्ती।
ऐसे जीव जाणती, ती सात्त्विक बुद्धी असती।।

धर्म-अधर्म, कर्तव्य-अकर्तव्य, हे यथार्थपणे नाही जाणत।
ज्या बुद्धी योगे ऐसे होत, तिला राजस बुद्धी म्हणतात।।

अधर्माला समजे जी धर्म, सर्व अर्थांना माने विपरीत।
अशा तमोगुणाने व्याप्त बुद्धीला, तामस बुद्धी असे म्हणतात।।

करी मन, प्राण, इंद्रियांचे कार्य, समाधी नित्य कायम ठेवून।
ऐसे जे एकनिष्ठ धैर्य, त्यास सात्त्विक धैर्य घे जाणून।।

ज्या धैर्याने करी धर्म काम अर्थ, तीनच पुरूषार्थ देह स्वस्वरूप मानून।
आचरी फलाची इच्छा धरून, त्यास राजस धैर्य ऐसे जाण।।

दुष्ट बुद्धीचा मनुष्य झोप, त्रास, शोक,खेद, ह्यांच्यात ज्या धैर्याने असे अडकत।
विषय अन् मद यांना नाही सोडत, त्यास तामस धैर्य म्हणतात।।

प्रारंभी जे कडू विषासारखे। परिणामी जे गोड अमृतासारखे।।
आत्मविषयक बुद्धियोगे जे उत्पन्न। ते सात्त्विक सुख ऐसे जाण।।

प्रारंभी गोड अमृतासारखे। परिणामी कडू विषासारखे।।
जे मिळे विषय इंद्रिये संयोगापासून। ते राजस सुख ऐसे जाण।।

आरंभी असो वा शेवटी, चित्ताला मोह पाडून।
निद्रा, आळस, प्रमाद पासून, तामस सुख होई उत्पन्न।।

प्रकृतिचे जे हे त्रिगुण, कोणी ना मुक्त त्यापासून।
असो प्राणी, पृथ्वी, स्वर्ग वा देव, सर्वांनाच त्रिगुणांचे बंधन।।

कर्म करावी स्वभावसिद्ध गुण, त्रिगुणांचे अमुक जास्त मिश्रण।
ऐसे झाले हे चार वर्ण, क्षुद्र, वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण।।

शुद्धी, क्षमा, तप, शम, दम, आस्तिक्य बुद्धी, सरळता, ज्ञान विज्ञान।
ऐसी ही ब्राह्मणांची स्वभावज कर्म, हे अर्जूना तु घे जाणून।।

पराङःमुख न होणे युद्धमध्ये, शौर्य, धैर्य, दक्षता, तेज।
दातृत्व आणि ईश्वरभाव, ही कर्मे क्षत्रियांची स्वभावज।।

वैश्यांची स्वभावसिद्ध कर्मे, शेती, व्यापार, गोरक्षण।
स्वाभावज ही सेवारूपी कर्मे, ऐसे हे चार वर्ण तु जाण।।

कर्म वर्णाश्रमधर्माप्रमाणे विहीत, आचरती जैसे सांगितले शास्त्रात।

ऐसे ज्याने केली आपली बुद्धी निश्चित, त्या मनुष्याला सिद्धी होती प्राप्त।।

भूतमात्रांची उत्पत्ती ज्याच्यापासून, जो सर्व विश्वात असे व्यापून।
वैराग्य मिळवितो मनुष्य, ईश्वराची कर्माने आराधना करून।।

जरी वाटे सोपा परधर्माचरण, स्वधर्माचरण वाटे कठीण।
जो करी स्वभावतः विहीत कर्म, त्यास पापाची न होई लागण।।

सदोष जरी स्वभाव सिद्ध कर्म, जे आपल्या जन्माबरोबरच झाले उत्पन्न।
करू नये कधी त्यांचा त्याग, सर्व कर्मे दोषयुक्त धुरातल्या अग्नी समान।।

इंद्रियांना कष्ट देऊन, आयुष्य खर्च करून , पाप सांचले निषिद्ध कर्म करून।
दुःख हाच त्या सर्वांचा परिणाम, काही लागे हाती स्वधर्माचरण त्यागून।।

नित्य करावे स्वधर्माचे आचरण, जो जन्ममरणाचे श्रम नाहीसे करून।
योग्य श्रेष्ठ पुरुषार्थ असे जो मोक्ष, देईल त्याची तो प्राप्ती करून।।

जो जितेंद्रिय आणि निस्पृह, न होई त्याची बुद्धी कोठेही आसक्त।
तो न अडके देहादिक संसार रूपी पाशात, तो उत्कृष्ट ज्ञानसिद्धीला होई प्राप्त।।

दैववान पुरूषाच्या कानी पडता गुरूवचन, नाश पावती त्याची बुद्धी जी द्वैत।

वृत्ती त्याची राही आत्मस्वरूपी स्थिर होऊन, मग त्याला कर्तव्य कर्म न काही उरत।।

स्वधर्मरूपी अग्नीमध्ये ज्या अधिकारी पुरूषाने,
काम्य व निषिद्ध कर्मरूप काष्ठाच्या सहाय्याने।
जाळून टाकले चित्तावरील रज तम दोष,
त्यांच्या आज्ञेत विषयाची इच्छा सेवकाप्रमाणे।।

असे ज्याचा अंकुश मनावर, विषयांचा ग्राह्य अग्राह्य नसे विचार।
मुक्तपणे धाव घेऊन इंद्रिये शुद्ध होती, नित्य करून निग्रहाचा प्रत्याहार।।

नित्य स्वधर्माचरण करून, फळ ते ईश्वराला अर्पण करून।
ईश्वरास अक्षयवैराग्य मागून, वैराग्यपद घेतले अढळ करून।।

झाली वैराग्य प्राप्ती अन् सद्गुरूची भेट, ज्ञानप्राप्तीची इच्छा मनात झाली निर्माण।
दृढ करी ब्रह्मचा अनुभव गुरू उपदेश, मोक्षाला ही नसे त्याठिकाणी स्थान।।

नाहिसा होती जागृति, सुषुप्ति स्वप्न, उरत नसे जेथे ऐक्याचा एकपण।
काही न उरता, जे असे शिल्लक, आत्मदर्शनाचा आनंद ही ब्रह्मस्वरूपात लीन।।

बुद्धी आत्मचिंतन रत द्वैताभिमान टाकून, इंद्रिये आत्माकार वृत्तित होती पावन।
ऐसी शुद्ध इंद्रिये लावी योग धारणेला, सात्त्विक धैर्याने अन् विषय त्यागून।।

इंद्रियांचा नियमन करी, मिताहारी राही एकांतात।
वैराग्याचा आश्रय अन्, ध्यानयोगाविषयी तत्पर सतत।।।

जो अहंकार, बल, क्रोध परिग्रह त्यागून, ब्रह्मरूप होई तो जो गर्व अन् इच्छारहित।
जो देहादिकाविषयी ममत्व बुद्धी रहित, ब्रह्माशी ऐक्य होता साधने होती शांत।।

जो ब्रह्मभाव योग्यता प्राप्त, आत्मबोधाच्या प्रशस्तिपदावर स्थित।
समबुद्धी अन् ना शोक ना इच्छा करीत, करून घेई माझी श्रेष्ठ भक्ति प्राप्त।।

सहजच ज्ञानभक्तिच्या योगाने, मी कोण, केवढा जो जाणे।
ऐसे जो घेई मज जाणून, निश्चित तयाचे मद्रूप होणे।।

मत्स्वरूपाचा उपभोग घेई, योगी मत्स्वरूप होऊन।
करी माझी भक्ती क्रियेवाचून, माझ्याशी अनन्य होऊन।।

जेथे बोलणाऱ्या शिवाय दुसरं कोणी नाही।
तेथे बोलणे हा व्यवहार घडत नाही।।

ऐसे बोलणे नसून ते माझे स्तवन।
बोलण्यात मी भेटत असल्याने बोलणे असे मौन।।

मद्रूप होऊन जो दृश्य वस्तु असे पाहत, त्याला दुसरी वस्तु वेगळी नाही उरत।

पहाणे ही नाही अन् न पहाणे ही नाही, असे ऐसे माझे खरे दर्शन निश्चित।।

कर्म कर्ता असा भेद जाऊन, जो आत्मा माझ्याशी ऐक्य होऊन।
कर्म कसे म्हणता येईल, जे कर्म करी तो मद्रूप होऊन।।

कर्म करतांना नसे कर्तुत्वाभिमान, त्याचे सर्व करणे न करण्यासमान।
अशा असे क्रिया आत्मस्वरूपी लीन, तीच असे माझ्या पूजेची खूण।।

जे बोलले ती माझी स्तुती, जे चालेल ती माझी यात्रा,
जी कल्पना करेल तो माझा जप, जे पाहिलं ते माझा दर्शन।
ती समाधी अवस्था असे तो ज्या स्थितीत असेल,
ऐसी ज्ञानभक्ताची असती लक्षणं, अर्जूना तु जाण।।
स्वानंदानुभवाच्या ऐक्याने एकत्र करून, न उरे तेथे मी देव तो भक्त हे द्वैत।
भाषा संपते अन् मी ला नसे थारा त्यात, हे ज्ञान ही होई स्वरूपानुभावात लुप्त।।

कर्मयोगाचे करून आचरण, तयाचे फळ मिळेल शुद्ध मीपण।
नसे गरज श्रमायची माझ्या प्राप्तीसाठी, कर्मयोग्याला मिळे जीवदशा अर्पण करून।।

स्वकर्मरूप सुंदर फुलांनी, मनोभावे पूजा माझी करून।
ज्ञाननिष्ठेचा प्रसाद प्राप्त करी, तो कर्मयोगी मला प्रसन्न करून।।

तत्पर हो विवेकयुक्त बुद्धीने, सर्व कर्मे मला अर्पण करून।
नित्य असू दे निष्ठा मजठायी, बुद्धी योगाचा आश्रय करून।।

जो राही माझ्या ठायी चित्त देऊन, पार पडेल माझ्या प्रसादाने सर्व संकटातून।
परि नाश पावेल तो, अहंकाराने नाही घेत ऐकून।।

हा जो तुझा आग्रही विचार, अहंकाराने म्हणे मी न करणार युद्ध।
मनात जरी केला दृढसंकल्प फार, परि हे क्षत्रिय स्वभाव सिद्ध।।

आरूढ झाला देहादिक यंत्रावर अभिमानाने,
सर्व हृदयस्त ईश्वर फिरवी सर्वांना मायेच्या योगाने।
शरण जा त्याला देह अहंकार, मन, चित्त सर्व भावाने,
निजाम्तपद प्राप्त होईल त्याच्या प्रसादाने।।

सांगितले तुला गुह्यात गुह्य ज्ञान, इच्छे प्रमाणे कर संपूर्ण विचार करून।
ऐक माझे गुह्य असे उत्कृष्ट भाषण, हिताची गोष्ट सांगितली तु मम प्रिय म्हणून।।

कर माझी भक्ती, माझ्या ठायी ठेव मन, नमस्कार कर मलाच, कर माझेच भजन।
मलाच मिळशील तु मत्स्वरूप होऊन, सत्य हे सांगितले तुला तु मम प्रिय म्हणून।।
सर्व धर्मा-अधर्माचा त्याग करून, अद्वैतभावाने मला ये शरण।
नको होऊ असा शोकमग्न, सर्व पापांपासून मी तुला मुक्त करीन।।

सर्व दुःखे जन्मतात आशेपासून, सर्व पातके निर्माण होतात निंदे पासून।
हीन स्थिती प्रसवते दुर्भाग्यापासून, धर्मा-अधर्माची साधन अज्ञानापासून।।

अशा अज्ञानाचा विनाश होता, न उरेल काही माझ्या शिवाय,
जो त्याच्या ठिकाणी सर्व व्यापक स्वरूप असे जाणून।
जो माझ्याहून काही वेगळे न मानून शुद्ध ज्ञानाने होतो अनन्य,
सर्वत्र माझे एकत्व जाणतो तो मला खराखुरा शरण।।

भिन्नपणा राखणे माझ्याहून, पापाचे वा संसार बंधनाचे कारण।
मला जाणून घे माझी प्राप्ती करून, मुक्त होशील सर्व बंधनातून।।

अभक्त, गुरुसेवारहित, तपोहीन, जो ऐकण्याची इच्छा नाही करत।
त्याला नको सांगु हे ज्ञान, जो असे माझी निंदा करत।।

जो हे माझे परमगुह्य ज्ञान, माझ्या ठायी दृढ भक्ती ठेवून।
निःसंशय घेई मत्स्वरूप प्राप्त करून, जो माझ्या भक्तांना सांगे हे गीता रत्न।।

माझे गुह्य ज्ञान सांगणाऱ्या पेक्षा, नसे कोणी मला अधिक प्रिय।
जगात पुढेही मला त्याच्यापेक्षा, होणार नाही कोणी अधिक प्रिय।।

जे फल गीतार्थ जाणून घेणाऱ्याला, तेचि फल मिळे जो करी गीता पठण।
निःसंशय समजावे त्याने केले, माझे ज्ञानयज्ञाने यथार्थ पूजन।।

जो मनुष्य निर्मत्सर, श्रद्धावान, हा संवाद जो करील श्रवण।
तो सहज पापमुक्त होऊन, शुभलोकी जाई जैसे पुरुष पुण्यवान।।

अर्जूनास विचारती भगवान, मोह जो झाला अज्ञानातून उत्पन्न।
झाला ना दूर तुझ्यापासून, कर्म अकर्माची झाली ना तुला जाण।।

संशयरहित होऊन म्हणती अर्जुन , तव कृपेने मोह नाहिसा होऊन।
झाले मज स्वस्वरूपाचे स्मरण, तुझ्या आज्ञेप्रमाणे मी नित्य वागेन।।

ऐसा हे श्रीकृष्ण अर्जुन , त्यांचा हा अद्भुत संवाद ऐकून।
म्हणती संजय रोमांचित होऊन, व्यासकृपेने हे ज्ञान मी केले श्रवण।।

वारंवार होत असे मी हर्षित, होता ह्या पुण्यकारक संवादाचे स्मरण।
पुनः पुनः होई मी आश्चर्यचकित, हरिच्या अद्भूत रूपाची होता आठवण।।

तयाच्या ह्याभावाची धृतराष्ट्राला नसे जाण, म्हणती संजयला भविष्य कर कथन।
संजय म्हणती निश्चित श्री विजय तेथे, जेथे धनुर्धर पार्थ आणि योगेश्वर श्रीकृष्ण।।

|| इति अष्टादशोऽध्यायः ||

|| श्रीकृष्णार्पणमस्तु ||

पसायदान

आता विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनिं मज ज्ञावे । पसायदान हें ॥
जें खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी- रती वाढो ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जीवाचें ॥
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्यें पाहो ।
जो जे वांच्छिल तो तें लाहो । प्राणिजात ॥
वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥
चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचें गाव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥
किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकी ।
भजिजो आदिपुरुखी । अखंडित ॥
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।
येथ म्हणे श्री विश्वेशराओ । हा होईल दान पसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥